मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ९० ✦ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✦ जून २०१२

वेबसाईट : www.marathepratishthan.org ✦ ई मेल : maratheparivar@yahoo.co.in

(फक्त खाजगी वितरणासाठी)



## संपादकीय

प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा स्नेहपूर्वक नमस्कार

वसंतऋतुचं स्वागत आपण सगळेजण आनंदाने करतो. भगवान श्रीकृष्णाने गीतेत, ''ऋतुनाम् अहं कुसुमाकरा'' असे अर्जुनाला सांगितले आहे. कुसमाकर म्हणजे वसंत. वसंतऋतूत वाढलेल्या, सुकलेल्या झाडांनाही तांबूस, पोपटी पालवी फुटते., मोगरा आसमंतात दरवळतो. आंब्याच्या झाडावर हिरवट पोपटी नाजूक कैऱ्या झुलतायत. अशा उत्साही, चैतन्यमय वातावरणातही असह्य उकाडा होतेय. वर्षाराणीची उत्सुकतेने वाट पाहिली जाते. कधी एकदाचा पाऊस पडतो असे वाटते आहे. 'नेमेचि येतो मग पावसाळा' याप्रमाणे आपले 'हितगुज'ही नेमाने कौतुक करायला येते आहे.

या अंकात 'माझी बायपास' हा श्री. अ. द. मराठे यांचा लेख, दिनांक १५ जूनला योगिनी एकदशीला ज्येष्ठ कृ. ११ला संत निवृत्तीनाथांची त्र्यंबकेश्वर येथे यात्रा भरते त्यानिमित्ताने 'निवृत्ती दातारे' हा लेख, सौ. वर्षा गोडबोले यांचा गांधर्व संगीत विद्यालयाच्या कृतज्ञतागौरव समारंभ सोहळ्याचे वर्णन करणारा लेख त्याचप्रमाणे श्री. प्र. सि. मराठे यांच्या अनुष्टुप ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पुस्तक परीक्षण, बडोद्यातील राज्यकारभारात शिक्षणाची दारं सर्वांसाठी खुली करणारे सयाजीराव गायकवाड या युगद्रष्ट्या महाराजांची दीडशेवी जयंती आहे त्यानिमित्ताने सौ. अंजली मराठे यांचा बक्षीसपात्र निबंध तसेच गोष्टी व कविता, प्रतिष्ठानवृत्त, वाचकांचा पत्रव्यवहार इ. साहित्य प्रकाशित केले आहे. 'मानसन्मान' मधून परिवारातील व्यक्तींच्या प्रगतीची माहिती 'हितगुज' वाचून समजते. असो.

या वर्षीपासून गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांनी बक्षिसे मिळविण्यासाठी प्रतिष्ठानकडे गुणपत्रिकेसहीत अर्ज करावे तसे आवाहन हितगुजमध्ये केले आहे. परीक्षेत पास झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

उन्हाळा त्यागी, हिवाळा भोगी, पावसाळा रोगी असे म्हणतात. तेव्हा हा पावसाळा आपल्या कुलबांधवांना आरोग्यसंपन्न जावो ही सदिच्छा!

- आपली शुभचिंतक

**डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे, (पृ.१२०)** ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई ४०० ०३१ दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९

दिनांक : २२मे,२०१२

◉ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे : ८/१३, सहकारनगर, वडाळा , मुंबई-४०००३१ ◉

दूरध्वनी : २४१५०८८९ ◆ ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com

◆ अक्षरजुळणी : सौ. अनघा विवेक मराठे, ठाणे. फोन : ९८३३१११९०२ ◆

Marathe Pratishthan



हार्मोनियम गुरू श्री. दिलीप गोसावी यांचा सत्कार करताना
प्राचार्य पंडित प्रमोद मराठे, मध्यभागी तालयोगी पं. सुरेश तळवलकर

# * कृतज्ञता समारोह *

आद्यगुरू पं. विष्णु दिगंबर पलुस्कर आणि त्यांचे पट्टशिष्य पं. विनायकबुवा पटवर्धन यांचे प्रती कृतज्ञता समारोह करण्याचे गांधर्व महाविद्यालय पुणेचे प्राचार्य पं. प्रमोद मराठे यांनी ठरवले. त्याचे कारण होते 'गांधर्व'ने यंदा ८० वर्षे पूर्ण केली.

८ मे १९३२ अक्षय्यतृतीया या दिवशी पं. विनायकबुवा पटवर्धन यांनी संगीत प्रचार आणि प्रसार हे ध्येय निश्चित करून संस्थेची स्थापना केली. पं. पलुस्कर पठडीच्या शिस्तीमध्ये सर्वच दृष्टीकोनातून संस्था नावारूपाला आली. पंडितजींच्या शिस्तबद्ध तालमीमध्ये अनेक शिष्य तयार झाले. शास्त्रीय संगीत क्षेत्रातच ते पण काम करू लागले.भ

जमखिंडीकर वाड्यातील मोठी जागा, ५-६ स्वतंत्र वर्ग, ऑफिस आणि मोठा हॉल जिथे अनेक मोठमोठे कलाकार सेवा म्हणून गाऊन गेले. कलाकार आणि रसिक श्रोते दोघांना पूर्ण मानसिक समाधान मिळवून देणारा कार्यक्रम तिथे होत असे आणि एक भारावलेले वातावरण तयार होत असे. येणाऱ्या प्रत्येकाला त्या वास्तूने एक प्रकारचे समाधान, शांती आणि आपलेपणा दिला आहे. त्याच जागेवर आताची नवीन वास्तू त्याच दिमाखात उभी आहे. आताही नवीन हॉलमध्ये कलाकार आपली सेवा रूजू करण्यात धन्यता मानतात.

पण हो, ८०वर्षांच्या मधल्या काळात विद्यालयाने थोडासा पडता काळही पाहिला आहे. पण सेवाभावी वृत्तीने काम करणारी काही मंडळीही होती. आपल्या घरच्या परिवाराप्रमाणे त्यांनी संस्थेकडे पाहिले. सातत्याने ८० वर्षे एखादी संस्था कार्यरत असणे ही काही साधी आणि सोपी गोष्ट नाही. ८०वर्षे म्हणजे सहस्त्रचंद्र दर्शन सोहळाच! एखाद्या व्यक्तिसाठी जशी ही ईश्वराकडे कृतार्थ भाव व्यक्त करण्याची संधी असते त्याप्रमाणे संस्थेच्या लेखीसुद्धा आपल्या गुरुंच्याप्रती आणि संस्थेच्या सहकाऱ्यांप्रती कृतज्ञताभाव व्यक्त करण्याची एक फार मोठी संधी आहे. अर्थात त्यासाठी अनेकांचे हातभार आवश्यक असतात. तसे ते आत्तासुद्धा मिळाले आहेत म्हणूनच सलग १५ दिवसांचा समारंभ इतक्या दिमाखदारपणे पार पडला.

कोणत्याही संस्थेविषयी प्रमुख व्यक्तिला एक आत्मीयता, ओढ, प्रेम आणि धाडसीवृत्ती, सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची कुशल संघटक वृत्ती अशा मनोवृत्तींची आवश्यकता असते.

ह्या सर्व गोष्टी एका व्यक्तीकडे असणे हे घडल्यामुळेच आज गांधर्व महाविद्यालयाने ही प्रगतीची उंची गाठली आहे.

२९ सप्टेंबर १९६२ रोजी संगीताचे बाळकडू घेऊनच प्रमोदजींचा जन्म झाला. वडील श्री. धुंडिराज गोविंद मराठे - संगीत प्रवीण - गांधर्वचे प्राचार्य. घरामध्ये आई कमलाबाई संगीत विशारद तर काका श्री. अनंतराव मराठे संगीत अलंकार. आमच्या

Marathe Pratishthan

# गायत्री मंत्र व्याख्या आणि व्याप्ती

**प्रा. विश्वास चक्रदेव (पृ.७२७), मुंबई**

**६. रे :** र् आणि कंठस्थ ए यांच्या संगमित उच्चारातून या अक्षराचा ध्वनी प्रसृत होतो. या अक्षराचे ऋषी लोटीत असून देवता इंद्र आहे. या अक्षराचा परिणाम मुखावर आहे. इंद्र ही याची ही देवता असल्याने इंद्रिय तृप्ती करणे हे या अक्षराचे प्रमुख काम आहे. ऋग्वेदामध्ये या देवतेला मोठे स्थान आहे. हे अक्षर पृथ्वीवरील प्राणवायूचे निदर्शन करते. या वायूमुळे मानवी जीवन व वनस्पती जीवन सुरळीत होते.

**७. 'णि' :** ण् आणि इ् यांच्या मिलापाने त्या अक्षराचा ध्वनी उत्पन्न होतो. अनुदत्त स्वरामुळे या ध्वनीचे तीव्रपण अधिक स्पष्ट करते. या ध्वनीची देवता बृहस्पती ही असून ऋषी गर्ग आहेत. विश्वदेव ही देवता देवगुरू म्हणून प्रसिद्ध आहे. या ध्वनीचा परिणाम ओठावर अधिक होतो. जी वेदविद्या मिळवली असेल ती ओठाच्या मर्यादेत साठविली जाते. गायत्री मंत्राच्या साहाय्याने पृथ्वीच्या पोटात पाण्याचे साठे कोठे आहेत ते कळण्यासाठी या अक्षराचा उपयोग होतो.

**८. 'यं' :** हे अक्षर टाळूच्या साहाय्याने उच्चारले जाते. या अक्षराची देवता पर्जन्य ही असून ऋषी ही वैदिक देवता आहे. या देवतेमुळे प्राणी जीवनास अत्यंत मदत होते. तोंडातील आतील भागावर या अक्षराच्या ध्वनीचा फार मोठा परिणाम घडतो. त्यामुळे तोंडातील अवयवाला सामर्थ्य प्राप्त होते. जिव्हाग्र, दातांच्या आतील बाजू, ताळू यांना सूक्ष्म संवेदनादेखील समजतील इतकी क्षमता या अक्षराच्या उच्चाराने प्राप्त होते.

**९. 'भ' :** हा ध्वनी कोमल असून उदात्त स्वरामुळे या ध्वनीची कोमलता विशेष जाणवते. या अक्षराची देवताही इंद्र आहे. सनतकुमार हे ऋषी आहेत. या ध्वनीचा उपयोग हनुवटीवर म्हणजेच संपूर्ण मुख सुशोभित करण्याकडे होतो. योगाभ्यासी लोकांना योग क्रियेत येणारे बंध साधण्यासाठी होतो. या अक्षराचे ऋषी याज्ञवल्क्य आहेत. विज्ञानात 'वादळ' या अवस्थेचे प्रतिपादन या अक्षराने केले जाते.

**१०. 'गों' :** र, ग आणि ओ यांच्या एकत्रिकरणाने हा ध्वनी निर्माण झालेला आहे. या अक्षराचे ऋषी सत्यवान असून देवता गंधर्व आहे. या अक्षराचा परिणाम मानवाच्या शरीरात असणाऱ्या तांबड्या वर्णाच्या वस्तूवर होतो. रक्तातील पेशीची जोपासना करणे हे या ध्वनीचे कार्य आहे.

**११. 'दे' :** या अक्षराचा उच्चार दातावर होणाऱ्या जिव्हेच्या स्पर्शामुळे होतो. या अक्षराचे ऋषी गंधर्व व देवता सत्यही आहे. या अक्षरामुळे प्रकाश निर्माण करण्याचे कार्य घडते. अध्यात्म क्षेत्रात त्रास देणाऱ्या दूरदर्शन नावाच्या सिद्धीचा या अक्षराशी जवळचा संबंध आहे. मानवी जीवनात अंतर्चक्षू नावाच्या स्थितीवर यांचे नियंत्रण आहे. विज्ञानात प्रकाश या अवस्थेचे प्रतिनिधीत्व करते.

**१२. 'व' :** हे ओठाच्या साहाय्याने ध्वनीत होणारे अक्षर आहे. उदात्त स्वरामुळे या ध्वनीला तीव्रपण प्राप्त होते. या अक्षराचा परिणाम विविध रसावर होतो. वनस्पतीमध्ये जे विविध रस असतात त्याची जोपासना करणे या ध्वनीचे कार्य आहे. गायत्री मंत्राचा उच्चार करताना या अक्षरावर विशेष जोर द्यावा.

**१३. 'स्य' :** स आणि य या वर्णाच्या मिलापाने हा ध्वनी निर्माण होतो. या अक्षराचा ऋषीदेखील कश्यप असून त्वष्ठा ही देवता आहे. ही देवता वैदिक असून शिल्पकार म्हणून उल्लेख आहे. या ध्वनीचा परिणाम मानवी शरीराच्या सौष्ठतेवर होतो. शरीरातील विकृत अवयवांना याचा उपयोग होतो.

**१४. 'धी' :** दातांवर होणाऱ्या जिव्हेच्या आघातामुळे हा ध्वनी निर्माण होतो. या अक्षराची देवता वसू आहे आणि ऋषी अत्री आहेत. वसू हे आठ आहेत.

आप म्हणजे पाणी, धरा-पृथ्वी, ध्रुव-टोक, सोम-चंद्र, अनिल-वारा, अनल-अग्नी, प्रत्युष-प्रभा, प्रभास-प्रकाश याचे अस्तित्त्व सदैव पृथ्वीवर असते म्हणून पृथ्वीला वसुंधरा म्हणतात. या ध्वनीचा परिणाम माणसाच्या मज्जातंतूवर होतो. तो सतत सरळ ठेवणे हे या ध्वनीचे प्रमुख कार्य आहे.

**१५. 'म' :** या अक्षराचे ऋषी विष्णू व देवता मरुत आहे. 'मारुत' ही इंद्र देवता म्हणून ओळखली जाते. वादळे निर्माण करणे, ढगाचा तीव्र आवाज पसरविणे वगैरे क्रिया करण्याचे सामर्थ्य या देवतेमध्ये आहे. या अक्षराच्या ध्वनी परिणाम हृदयावर होतो.

विज्ञानात वायूची स्फोटक अवस्था निर्माण होते त्याचे प्रतिनिधित्व हे अक्षर करते. अणु-स्फोटातून होणारे किरणाचे उत्सर्जन यांचे प्रतीक मानले जाते.

**१६. 'हि' :** कंठातून हा ध्वनी प्रकट होतो. या अक्षराचे ऋषी पराश असून देवता त्वष्टा आहे. ऋषी व देवता यांच्या सान्निध्यामुळे या ध्वनीला अमृत्व प्राप्त होते. ह्या ध्वनीचाा परिणाम नाभी-स्थानावर होतो. त्यामुळे वाणी शुद्ध होण्याचे काम होते.

**१७. 'धि' :** ह्या अक्षराचा उच्चार दंतातून होतो. देवता अंगीरस आहे. देवतेसंबंधी अनेक ऋचा ऋग्वेदात आहे. ह्या अक्षराचे ऋषी पुंडरीक आहे. ह्या ध्वनीचा परिणाम मानवाच्या त्वचेवर होतो. अक्षराची स्पंदने त्वचा निरोगी राखण्याचे काम करते.

**१८. 'यो' :** या अक्षराची देवता विश्वदेव असून ऋषी ऋमक आहे. विश्वदेव ह्याची संख्या नऊ असून वैदिक काळात यांची उपासना विशेष प्रकार होत असे. सूर्याच्या आधाराने ह्या देवता विश्वाचे कल्याण करतात. या अक्षराच्या ध्वनीचा परिणाम उदरावर होतो व पचनासाठी लागणारी उष्णता वैश्वावर नावाच्या प्रखर किरणांनी दिली जाते. गायत्री मंत्राच्या साहाय्याने ती कायम टिकविता येते.

**१९. 'यो' :** या अक्षराची देवता विश्वदेव असून ऋषी दक्ष आहेत. उडणारे पक्षी आणि सूर्य किरणामध्ये असणारे धुळीकण यावर याचा

Marathe Pratishthan

विशेष प्रभाव पडतो. हे धुळीकण पृथ्वीवर निरोगीपण घेऊन येतात. या किरणाचा परिणाम पचन क्रियेवर विशेष करून होतो. पचनाचा त्रास ज्यांना असेल त्यांनी पोट रिकामे असेपर्यंत ह्या अक्षरावर जोर देऊन गायत्री मंत्र म्हणावा म्हणजे त्यांना बराच फायदा होईल.

**२०. 'नः' :** हे अक्षर दातांच्या साहाय्याने उच्चारले जाते. हा ध्वनी मानवी शरीरावर विशेष परिणाम करणारा आहे. कंठातील मध्यमावाणीची स्पंदने निर्माण करण्याचे कार्य होते. गायक लोकांना खर्ज लावताना त्रास होत असले तर त्यांनी या अक्षरावर जोर देऊन गायत्री मंत्र जपावा. वक्ते आणि शिक्षक यांना अत्यंत जरुरी आहे. ह्या अक्षरांची देवता भर्गो असून अंगिरा ऋषी आहेत. ह्या ध्वनीने शरीरात अधिक प्रकंपने निर्माण होतात.

**२१. 'प्र' :** र् आणि प यांच्या संयुक्त उच्चाराने ध्वनी निर्माण होतो. ह्या अक्षराची देवता शर्व व ऋषी कार्तिकेय आहे. जगतील वाईट वस्तूचा नाश करणारी म्हणून ही देवता प्रसिद्ध आहे व ही रूद्र देवता म्हणून ख्यात आहे. व्याधीपासून मनुष्याला दूर ठेवण्याचे कार्य या ध्वनीत आहे. गायत्री मंत्राच्या उच्चारात हे अक्षर अधिक स्पष्ट व जोर देऊन उच्चाराने शारीरिक आरोग्य प्राप्त होते.

**२२. 'चो' :** टाळूवर झालेल्या जिव्हेच्या आघाताने हा ध्वनी निर्माण होतो. ह्या अक्षराची देवता ब्रह्मा असून रूद्र हे ऋषी आहेत. मानवी शरीरातील गुप्तेंद्रियांवर या अक्षराचा ताबा आहे. गायत्री मंत्राची उपासना करताना या अक्षरावर लक्ष केंद्रित केल्याने त्याचे फल त्वरित मिळते.

**२३. 'द' :** या अक्षराची देवता ब्रह्म आहे व अगस्ती ऋषी आहे. या अक्षराचा उपयोग गर्भामध्ये असणाऱ्या जीवावर होतो. त्यांचे वर्धन करण्याचे कार्य हा ध्वनी करतो. ह्या ध्वनीची साथ नेहमी मनुष्याला मिळते.

**२४. 'यात्' :** हे सर्वांत शेवटचे अक्षर असून हा ध्वनी गायत्री मंत्रामध्ये अतिशय प्रभावी समजला जातो. देवता, सविता ही असून ऋषी विश्वामित्र आहेत. ह्या अक्षराच्या अभावामुळे मंत्र अपुरा होतो. तोपर्यंत मंत्राची शक्तीदेखील विस्कळित होते. ते पूर्ण करण्याचे कार्य विश्वामित्राने केले. मंत्र पूर्ण होताच त्याचे सामर्थ्य त्यानेच जगाला दाखवून दिले. या अक्षराचा प्रभाव मानवाच्या सर्वांगावर होतो. अक्षरावर लक्ष केंद्रित केल्यास मनुष्याला तपो तेजाची प्राप्ती होते.

गायत्री मंत्रामुळे दहा शब्द आणि त्या शब्दामध्ये चोवीस अक्षरे आहेत.

या मंत्राच्या प्रत्येक अक्षराने कोणते सांसारिक फळ मिळते हा आढावा ऋषीनी घेतला होता. संसाराच्या अवस्थेतून पारमार्थिक अवस्था प्राप्त होते. त्यासाठी कर्म सूचिता लागते. मंत्राच्या साहाय्याने ती प्राप्त होते. गायत्री मंत्रातील प्रत्येक अक्षराचे वैभव एकदम नजरेसमोर यावे व वाचकांना कळावे म्हणून हे विस्तृत लिहिले.

**पद :** ***ॐ भूः भुवः स्वः तत् सवितुः वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि धियः यः नः प्रचोदयात***

(ऋग्वेद, ३-५-१०)

***अन्वय - ॐ भूः भुवः स्वः तत् सवितुः देवस्य वरेण्यं भर्गः धीमहि यः धियः नः प्रचोदयात्।***

**सामान्य शब्दार्थ :** प्रणवोत्पन्न पृथ्वी अंतरिक्ष व स्वर्ग यांच्याही पलीकडे असणाऱ्या त्या सूर्यदेवाच्या, पापवाहक तेजाचे आम्ही ध्यान करतो. जो (सूर्य) आमच्या बुद्धीला प्रेरणा देवो.

मंत्र :

***ॐ भूः भुवः स्वः तत्संवितुर्वरैण्यं भर्गो देवस्य धीमहि धियो यो नः प्रचोदयात।***

**- प्रा. विश्वास चक्रदेव**
ए ६/६, ब्लॉक २६, जीवनशांती सागर सोसायटी, जीवनबिमा नगर, बोरिवली (प.)
मुंबई- ४००१०३ फोन नं. ९९६९१४४०९७

## आजीने नातवाच्या मुंजीत केलेली कविता

### हळदी सोहळा

*बघता बघता चिमणा प्रणित मोठा झाला*
*पहिलीतून तो आता दुसरीत गेला*
*आठवे वर्ष त्याला लागले*
*त्यांच्या घरात मुंजीचे वारे वाहू लागले*
*आमच्या डोळ्यासमोर त्याच्या*
*बाललीला येऊ लागल्या*
*कृष्णासारख्या खोड्या आणि खेळ*
*तरीही समंजसपणाचा घालत होता मेळ*
*प्रेम करतो आईबाबांवर*
*तसेच साऱ्या मुक्या प्राण्यांवर*
*माणसा-प्राण्याचे जमवीत असे गोकुळ*
*आणि त्यांच्या वेदनेने होत असे व्याकुळ*
*त्या बाललीला आठवून झालो आम्ही धन्य*
*दाटून येत होते डोळ्यात आमच्या पर्जन्य*
*आहे तो हुशार, प्रेमळ, विचारी*
*आहे तो सदृढ, पण मनाने फारच हळवा*
*आणि रूपाने दिसतो जणू कृष्ण सावळा*
*मुंज हळदीचा सोहळा आहे आज*
*बटूस चढवू शुभआशीर्वादाचा भरपूर साज.*

### मुंज मेळा

*बटूची हळद लावून झाली, मुहूर्ताची वेळ जवळ आली*
*छोटा बटू दिसत होता छान, जणू केवड्याचे कोवळे पान*
*सुवर्णाचे तेज त्याच्या भाळी, दुष्टबंधनाची तीट लावली काळी*
*डोईवर कृष्णकमळ कोरले, मुखावर हास्य त्याच्या पसरले.*
*नाही होणार तो कधी कपटी, बरसत होती आशीर्वादाची वृष्टी*
*भेटवस्तूंचा मिळाला होता मेवा, आणि अनमोल शुभेच्छांचा लाभला होता ठेवा*
*मुंजीचे गांभीर्य नव्हते त्याच्या मनी, बंधूसमवेत गात होता मजेत गाणी*
*मंडपात चालू होती खूप मस्ती, लोळून करत होते आपसात कुस्ती*

- सौ. नीलिमा विद्वांस माणगाव, मोबाईल : ९८६०८३४८६१



Marathe Pratishthan

**बक्षिसपात्र निबंध**

## पुण्यश्लोक श्रीमंत महाराज

# श्री सयाजीराव गायकवाड ह्यांनी पेरलेले वाचन संस्कृतीचे बीज

**प्रेषक : सौ. अंजली आशुतोष मराठे, बडोदे (पृ.३८०)**

श्रीमंत महाराज श्री सयाजीराव गायकवाड यांची १५०वी जन्मजयंती या वर्षी बडोदे शहरात साजरी करण्यात येत आहे. त्यानिमित्ताने, त्यांच्या अनेकविध पैलूंपैकी एका पैलूंवर दृष्टीक्षेप टाकण्याचा हा अल्पसा प्रयत्न.

महाराज श्री सयाजीराव - एक आदर्श नृपती, प्रजावत्सल, प्रजाहितदक्ष राजा. आपल्या राज्याचा,राज्यातल रहिवाशांच्या प्रजाजनांचा सतत विकास होत राहावा हाच ध्यास मनाशी बाळगत या पुण्यश्लोक राजाने अनेक कल्याणकारी उपक्रम सुरू केले होते. बडोदे संस्थानास संस्कारनगरी, कलानगरी बनविण्यो स्वप्न त्यांनी उराशी बाळगले आणि काळापलीकडची दृष्टी ठेवून ते साकार करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्नही केले होते.

महाराज प्रवासाचे अत्यंत शौकिन. सतत प्रवास करत असताना, जे जे शिकायला मिळेल ते शिकावे व त्याचा उपयोग आपल्या राज्यातील लोकांसाठी करावा असा त्यांचा ध्यास असे. त्यातून कुतूहल व चिकित्सक बुद्धी दिसत होती. वाचनाचा दांडगा व्यासंग होत. त्यामुळे त्यांच्या सृजनशीलतेला नेहमीच आव्हान मिळत असे. आणि त्यांच्या विविध कल्पना आकाशात भरारी घेत असत.

जातीभेद नष्ट झाले पाहिजेत, सामाजिक दुष्ट चालींचा नायनाट झाला पाहिजे, ज्या कायद्यांमुळे समाजातील वेगवेगळ्या वर्गात भेदभाव, जातीभेद निर्माण होतात. त्या कायद्याचे उच्चाटन झाले पाहिजे अशा क्रांतिकारी विचारांच्या श्री सयाजीराव महाराजांनीआजपासून शंभर वर्षांपूर्वीच्या काळात संन्यासदीक्षा, बालविवाह प्रतिबंध, अस्पृश्योद्धार, स्त्री स्वातंत्र्य, सक्तीचे शिक्षण, हिंदी भाषा प्रचार अशा अनेक महत्त्वाच्या प्रश्नांना चालना दिली होती. समाजात अज्ञानाचा अंध:कार दूर व्हावा म्हणून शिक्षणाचा प्रसार करण्याचे मनावर घेतले आणि राज्याच्या प्रत्येक शहरात, गावात शाळा आणि वाचनालये उभारण्याचे मोलाचे कार्य केले.

जसे प्रत्येक गावात एक तरी मंदीर असते,



तसे प्रत्येक गावात एक तरी वाचनालय असावे असा महाराजांचा आग्रह असे. वाचनामुळे ज्ञानाचा प्रसार होतो, व्यक्तीचे विचार स्वातंत्र्य विस्तारते, प्रगल्भ होते, कल्पनाशक्तीला वाव मिळतो. फक्त घडामोडींविषयी पण माहिती मिळते. समाजाची व पर्यायाने देशाची प्रगती करायची असल्यास प्रत्येक व्यक्तीने वाचनाचा छंद जोपासायलाच हवा यावर त्यांचा भर असे.

बडोदे शहरात सर्वप्रथम वाचनालय स्थापले गेले ते १ मार्च १८७७ रोजी. श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या हस्ते या वाचनालयाचे उद्घाटन झाले होते व 'स्टेट लायब्ररी' असे त्याचे नाव ठेवण्यात आले होते. त्यानंतर अनेक वर्षे या वाचनालयासाठी महाराजांकडून अनुदान दिले गेले. राजस्नुषा श्रीमती शकुंतलाराजे गायकवाड यांनी या वाचनालयासाठी मोठी रक्कम देणगी म्हणून दिली व ९ मार्च १९२४ रोजी त्यांचे पती श्रीमंत जयसिंहराव गायकवाड यांचे नाव या वाचनालयास देण्यात आले 'श्री जयसिंहराव सार्वजनिक वाचनालय'

जयसिंहराव वाचनालयाच्या हीरक महोत्सवी भाषण करताना दिनांक १६-१२-१९३७ रोजी महाराजांनी खालील उद्‌गार व्यक्त केले होते :

'हिंदुस्थानच्या प्राचीन संस्कृतीच्या तेजाने प्राचीनांचे जग उजळले गेले, परंतु मध्यंतरीच्या अंधाराच्या युगात हिंदुस्थानची गतकालाची उज्ज्वल परंपरा तुटली. प्रत्यही जग पुढे जात आहे. त्याच्या बरोबरीने आपणास राहवायाचे असेल तर आपण ज्ञानाचे अर्जन करून अधिकाधिक प्रसार करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.'

फक्त बडोद्यातच नव्हे, तर समग्र देशात सार्वजनिक वाचनालयाची सुरुवात करणारे प्रथम राजे होते श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज. बडोद्यातील वाचनप्रेमी, सहित्यप्रेमी लोकांची वाचनाची भूक भागविण्याचे खूप महत्त्वाचे कार्य या राजाने केले.

दिनांक १३-१२-१९१२ रोजी सार्वजनिक पुस्तकालयातर्फे मानपत्र समर्पण समारंभात भाषण करतानाचे त्यांचे उद्‌गार होते -

''पुस्तक संग्रहालयाच्या कामी मी झाडाच्या मुळ्यांचे उदाहरण घेतो. लोकांचे ठिकाणची ज्ञान मिळवण्याची इच्छा या झाडाच्या मुळ्या होत. या मुळ्यांवर जे केस असतात, त्या समाजातील दर एक व्यक्तीच्या इच्छा म्हणून धरता येतील व एकंदर मुळ्यांचा समूह म्हणजेच एकंदर समाजाची ज्ञानलालसा.''

यावरून त्यांची चिकित्सक, सखोल विचार करण्याची वृत्ती, ज्ञानप्रसाराबद्दलची कळकळ, तळमळ दिसून येते. बडोदे शहरातील वाचनप्रेमी व्यक्तींबरोबरच इतर प्रजाजनांमध्ये वाचनाची रूची निर्माण व्हावी यासाठी श्री जयसिंहराव वाचनालयात विविध विषयांवरील पुस्तके, ग्रंथ, सामायिके, वर्तमानपत्र ठेवण्यात आली. नाटके, काव्य, कथा, निबंध असे साहित्याचे अनेक प्रकार येथे हाताळायला मिळतात. तसेच संस्कृत, इंग्रजी, गुजराती, मराठी, हिंदी आणि उर्दू भाषेतील जुने ग्रंथ, वाङ्मय, साहित्य येथे उपलब्ध आहे. अधिकाधिक ज्ञान संपादन करायचे असेल तर भाषेचा बाध ठेवता कामा नये. अशा विचारांचे महाराज दिनांक २४-१०-१९०९ रोजी बडोदे साहित्यसंमेलनातील आपल्या भाषणात सांगतात,

'भाषा ही मनुष्याच्या आणि समाजाच्या



Marathe Pratishthan

प्रगतीची तसबीर आहे. ही प्रगतीचे एक साधनही आहे. नीतीचा, ज्ञानाचा व राष्ट्राचा उत्कर्ष होणे हे तिचे साध्य आहे. व म्हणूनच कोणत्याही राष्ट्राची स्थिती तिच्या भाषेवरूनच व्यक्त होते.'

१९१० साली महाराजांनी मध्यवर्ती वाचनालय म्हणजे सेंट्रल लायब्ररीची स्थापना केली. ही विश्वातील दुसऱ्या क्रमांकाची सेंट्रल लायब्ररी मोजली जाते.

बडोद्यातील मांडवी स्थित या विशाल ग्रंथालयात सर्व भाषेची वर्तमानपत्र, सामायिके आहेत. शिवाय त्यात कॉपीराईट, बाल, महिला, वरिष्ठ नागरिक, विद्यार्थी असे वेगवेगळे विभाग आहेत. शंभर वर्षांपूर्वी या ग्रंथालयात, 'न्यूयॉर्क टाइम्स' हे वृत्तपत्रसुद्धा मागवलं जात असे. विदेशातल्या बातम्या घेऊन हे वृत्तपत्र सात-आठ दिवसांचा बोटीचा प्रवास करून बडोद्यात पोहोचत असे. पण महाराजांनी बडोद्याच्या नागरिकांसाठी ते मध्यवर्ती वाचनालयात उपलब्ध करून दिले होते.

अशारीतीने लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांच्या वाचनाची गरज भागविली जात असे.

ही वाचनालय प्रवृत्ती फक्त बडोद्यापुरतीच सीमित राहू नये व राज्यातील इतर शहरात तसेच इतर राज्यातही याचा प्रसार व्हावा असे जेव्हा महाराजांच्या मनात आले, तेव्हा पेटलादच्या शाळेचे हेडमास्तर मोटाभाई अमीन यांना ही प्रवृत्ती सोपविण्यात आली होती. १९४७-४८मध्ये जेव्हा भारतास स्वातंत्र्य मिळाले व बडोदे राज्य किंवा संस्थान भारतात विलीन झाले तेव्हा नवसारी ते द्वारकापर्यंत पसरलेल्या या राज्यात जिल्हा व कसबा मिळून ७२ पुस्तकालये, १४२० ग्राम्य पुस्तकालये, २४ महिला पुस्तकालये, १९ बाल पुस्तकालये व २७ सार्वजनिक पुस्तकालये होती.

अशा तऱ्हेने कार्य करण्याची क्षमता तर त्यावेळच्या राज्यकर्त्यांमध्ये होतीच पण असे उत्तम कार्य करण्याची, ज्ञानदानाची दावतही होती म्हणून ही वाचनालय प्रवृत्ती बहरत गेली.

इतर राज्यातही महाराजांनी या प्रवृत्तीय आर्थिक अनुदान देऊन वेग दिला. बनारस येथील हिंदू युनिव्हर्सिटीची सेंट्रल लायब्ररी १९१७मध्ये स्थापन झाली. या विद्यापीठाचे संस्थापक, पंडित मदन मोहन मालवीय जेव्हा १९३१मध्ये लंडन येथील गोलमेज परिषदेत भारताचे प्रतिनिधित्व करून परत आले तेव्हा त्यांच्या सूचनेप्रमाणे, ब्रिटिश म्युझिअमच्या इमारतीच्या नमुन्याप्रमाणे या वाचनालयाची नवी इमारत तयार केली गेली व यासाठी आर्थिक अनुदान दिले गेले ते महाराज सयाजीराव यांच्याकडून

अशाप्रकारे बडोदे राज्यच नव्हे, तर संपूर्ण देशात सार्वजनिक वाचनालय सुरू करणारे प्रथम नृपती महाराज सयाजीराव गायकवाड यांनी १९११मध्ये वाचनालय प्रशिक्षण वर्गाची सुरुवात केली ज्यात अशा वाचनालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी योग्य व कार्यकुशलतेने काम करणे हे शिकविले जात असे. १९१३ साली त्यावेळच्या लक्ष्मी विलास पॅलेस ग्रंथालयाचे ग्रंथपाल यांनी लिहिलेले व डब्ल्यू. ए. बोरडन एक अमेरिकन ग्रंथपाल, ज्यांना महाराजांनी आमंत्रित केले होते, त्यांनी प्रस्तावित केलेले ''Hints on Library Administration '' हे पुस्तक भारतातीा लायब्ररी सायन्स विषयावरील प्रकाशित प्रथम पुस्तक होय. तसेच १९१२ मध्ये पहिले त्रैमासिक 'लायब्ररी सायन्स जर्नल' हे बडोद्याहून मराठी, गुजराती व इंग्रजी अशा तीन भाषांमधून प्रकाशित होत असे.

सध्या बडोद्यात या दोन मोठ्या वाचनालयाव्यतिरिक्त संस्था वसाहत येथील सरकारी वाचनालय, अलकापुरी येथील सरकारी वाचनालय तसेच अनेक खाजगी पुस्तकालये आहेत व ती सर्व बडोदेकरांनी वाचनाची भूक भागवित आहेत.

आज वाचनाचा उत्तम संस्कार घडल्यामुळे बडोदेकर एका प्रगत समाजाचा हिस्सा आहेत. अर्थातच याचे बीज रोपले गेले होते, महाराजांच्या शासनाच्या सुवर्णकाळात. आज त्या विशाल वृक्षाच्या अनेक शाखांवरील गोड, मधुर फळे आपण चाखत आहोत

ह्या थोर, महान, श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांना आमचे कोटी कोटी वंदन!

**- सौ. अंजली आशुतोष मराठे**
'अन्नपूर्णा', शास्त्री पोळ, मराठे बाग,
कोठीजवळ, बडोदे-वडोदरा - ३९०००१

## साभारपोच

मराठे प्रतिष्ठानला ज्ञानेश्वरी हा बहुमोल ग्रंथ भेट दिल्याबद्दल लेखक श्री. प्र. सि. मराठे यांचे हार्दिक आभार.

-संपादिका

# सुबोध अनुष्टुप ज्ञानेश्वरी

प्र. सि. मराठे

**मूळ किंमत ८००रुपये** **सवलतीत ५५०रुपये**

श्री. प्र. सि. मराठे (पृ.३२७) यांची 'अनुष्टुप ज्ञानेश्वरी' म्हणजे एक 'अहो आश्चर्य' म्हणावे अशी थोर कलाकृती आहे. ती माऊली ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीची (हल्लीच्या काळातील) धाकटी बहीणच आहे. 'मूकं करोति वाचालं । पंगु लंघयते गिरीम्।' अशी कृपा करणाऱ्या गोविंदाचा वरदहस्त लाभल्यावर श्री. मराठे यांच्या प्रतिमेने उड्डाण केले आणि कमालीच्या वेगाने ओव्यांमागून ओव्या आपला जुना पेहेराव बदलून आधुनिक साध्या, सोप्या मराठीत नटून थटून त्यांच्यापुढे श्लोकांच्या रूपात हात जोडून उभ्या राहिल्या. श्री. प्र. सि. मराठे यांचे हे प्रचंड कार्य श्रीकृष्णाच्याच कृपेने पार पडले आहे. या ग्रंथाने त्यांनी मराठी वाङ्मयात एक इतिहासच घडविला आहे.

- साक्षात्कारी कृष्णभक्त - दि. अ. घैसास

Marathe Pratishthan

# श्रीमत सुबोध अनुष्टुप ज्ञानेश्वरी

श्री. प्र. सि. मराठे (पृ.३२७)

*।।श्री।।*
*ॐनमो भगवते वासुदेवाय।*
*श्रीज्ञानेश्वरी*
*अध्याय पहिला*
*अर्जुनविषादयोग:।*
*।।श्रीगणेशाय नम:।।*
*श्रीगुरुभ्यो नम:।।*
*श्रीगोपालकृष्णाय नम:।।*
*ॐ नमो जी आद्या। वेदप्रतिपाद्या।*
*जय जय स्वसंवेद्या।। आत्मरूपा।।१।।*
*देवा तूंचि गणेशु। सकलार्थमतिप्रकाशु।*
*म्हणे निवृत्तिदासु।। [१]अवधारिजो जी।।२।।*
*हे शब्दब्रह्म अशेष। तेचि मूर्ति सुवेष। तेथे वर्णवपु निर्दोष। मिरवत असे ।।३।।*
*स्मृति तेचि अवयव। रेखा आंगीकभाव।*
*तेथ लावण्याची ठेव। अर्थशोभा।।४।।*
*अष्टादश पुराणे। तींचि मणिभूषणे ।*
*पदपद्धती [२]खेवणे। प्रमेयरत्नांची।।५।।*
*पद्यबंध नागर। तेंचि रंगाथिले अंबर[३]।*
*जेथ साहित्य [४]वाणे सपूर। उजाळाचे ।।६।।*
*देखा काव्य नाटका।जे निर्धारिता सकौतुका।*
*त्याचि रुणझुणती क्षुद्रघंटिका।*
*अर्थध्वनि।।७।।*

१-ऐकावे, २-कोंदणे, ३-वस्त्र, ४-माल, जिन्नस, रंग, वर्ण.

ज्ञानेश्वरी, अध्याय १, प्रारंभपूर्व ओव्या १ ते ८४ - 'ज्ञानेश्वरी' हा भगवद्‌गीतेचा भावार्थ अधिक स्पष्ट करून सांगण्यासाठी रचलेला 'टीकाग्रंथ' पआहे. प्रत्यक्ष गीतेवर निरूपण सुरू करण्यापूर्वी 'प्रास्ताविक' म्हणून ज्ञानोबांनी पहिल्या ८४ओव्या रचल्या आहेत. कोणत्याही शुभ कार्यास आरंभ करण्यापूर्वी परमेश्वराचे स्तवन करण्याच्या वैदिक परंपरेप्रमाणे ज्ञानोबांनी पहिल्या २७ ओव्यांत, ब्रह्मतत्त्वाचे प्रतीक जो ॐकार, त्याच्या स्वरूपात मूर्त झालेल्या श्रीगणेशाचे व नंतर वाग्देवी सरस्वतीचे, आणि प्रत्यक्ष परमेश्वरासमान असलेल्या आपल्या गुरूंचे स्तवने केले आहे. व पुढे २२ ते ८४ या ओव्यात प्रत्यक्ष भगवंताच्या मुखातून अवतरलेल्या भगवद्‌गीतेचा व ते फळ ज्या वृक्षाला लागले त्या महाभारत ग्रंथाचा महिमा वर्णन केला आहे.

ओव्या १ ते २० (गणपती स्तवन) - (ओवी १) ॐकार रूपी ब्रह्मतत्त्वाचा जय-जय करून त्याला नमन करण्यासाठी ज्ञानोबांनी पहिल्याच आवेती चार संबोधनात्मक विशेषणे अशी योजिली आहेत, की अप्रत्यक्षपणे सर्व वेदविद्येचे जणू सारच ते वाचकांपुढे ठेवत आहेत असे मला भासते. सर्व ब्रह्मांड ज्यातून उद्‌भवले, त्या सर्व विश्वाचे आदि Causeless cause जे ब्रह्मतत्त्व ते निर्गुण निराकार असल्यामुळे आपल्या पंचेन्द्रियांना अगोचर असले तरी सर्वांच्या हृदयांतरी ते आत्मरूपाने वसत असल्यामुळे, आपणच आपला आत्मशोध घेतल्यास (स्वयंवेद्या) आपण त्याचा अनुभव घेऊ शकतो हे वेदविद्येचे गुह्य तत्त्वच ज्ञानोबांनी पहिल्याच ओवीत अशा रीतीने गोवले आहे की, सूज्ञ वाचकांना हे जाणल्यानंतर जमिनीत खणताना गुप्त धनाचा ठेवा मिळाल्याचा आनंदच अनुभवास यावा. (ओव्या २ ते ७) गणेशा तू केवळ ज्ञानसूर्यच आहेस, तुझ्या प्रकाशाच्या प्रेरणेनेच मी हे गीतेवर भाष्य करणार आहे. असे विनयपूर्वक सांगून, गणेशाच्या निरनिराळ्या अवयवांचे ज्ञानोबा रूपकात्मक वर्णन करत आहेत. शब्दब्रह्म जे वेद तेच तुझ्या मनोहर मूर्तीत प्रकटले आहेत. स्मृती याच जणू त्या मूर्तीचे अंग आहेत. त्या अंगाचे हावभाव म्हणजेच गीतेचे श्लोक आहेत. आणि त्या श्लोकांचा आशय म्हणजेच कोणी अलंकार त्या अंगावर तेजाने झळकत आहे. वेदांततत्त्वांच्या रत्नांना शब्दांच्या कोंदणात बसवून रचलेली अठरा पुराणे हेच जणू दागिने तुझ्या अंगावर शोभत आहेत. त्या काव्याचा आशय हाच तुझा पितांबर आहे आणि काव्यालंकार रूपाने त्या पितांबराचे पोत चकाकत आहे. त्या काव्यातील शब्दांच्या जणू घुंगुरमालाच रुणझुण स्वरांनी काव्यार्थ सांगत आहेत. (२ ते ७)

*।।श्री।।*
*ॐ नमो भगवते वासुदेवाय।*
*अनुष्टुप ज्ञानेश्वरी*
*अध्याय पहिला*
*अर्जुनविषादयोग:।*

श्लोक १-८४ मंगलाचरण व प्रास्ताविक
ॐकार, आदि सर्वांचा, वेदही वर्णिती जया।
आत्मरूपे वसे भूतीं, स्वयंवेद्य, नमो तया।।१।।
ज्ञानदेव म्हणे, आता ज्ञानबुद्धिप्रकाश तूं।
गणेशा ऐक, सांगे मी, प्रेरसी जे मलाच तू।।२।।
शब्दब्रह्मचि जे वेद, तुझी मूर्ती मनोहर।
तुझ्या अक्षर-कायेचे झळके तेज सुंदर।।३।।
स्मृती या मूर्तिचे अंग, हावभाव चि श्लोक ते।
श्लोक-आशय-लेण्यांचे तळपे अंगि तेज ते।।४।।
अष्टादश पुराणे ती, रत्नांचे जणु दागिने।
जणु तत्त्वार्थ-रत्नांना, शब्द-कोंदणि स्थापिले।।५।।
काव्य आशय सुश्राव्य गणेशाचा पितांबर
काव्यालंकार जणु ते, त्याचे पोत चकाकिते।।६।।
जणु घुंगुर-माला ची काव्याशयपदांची ती।
घुंगूर रुणझुणूनी जणु काव्यार्थ सांगती।।७।।

**- श्री. प्र. सि. मराठे (पृ.३२७)**
**मुंबई**

---

**माझ्याकरिता मी नसून मी लोकांकरिता आहे. माझ्याकरिता जग नसून मी जगाकरिता आहे ही वृत्ती आपण ठेवावी**

- गोंदवलेकर महाराज



Marathe Pratishthan

**पुस्तक परीक्षण**

# अमृतानुभवी मंत्राक्षरे

**ललिता बापट**

सुमारे सातशे वर्षांपूर्वी श्री ज्ञानेश्वर माऊलींनी सर्वसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरी लिहिली. पण आज एवढ्या वर्षांनी ती भाषाही अवघड वाटते. त्यासाठी प्र. सि. मराठे यांनी सोप्या शब्दांत, अनुष्टुपछंदात ज्ञानेश्वरी लिहिली आहे.

श्री ज्ञानेश्वरी, हरिपाठ, श्री तुकारामगाथा म्हणजे वारकरी संप्रदायाची प्रस्थानत्रयी. श्री ज्ञानेश्वरीमधील ओव्या म्हणजे श्रीमुखातील अमृतानभवी मंत्राक्षरेच! अर्थात या मंत्राक्षरांची भाषा सातशे वर्षांपूर्वीची! कै. वै. वि. स. पागे म्हणत की नेवाशाच्या सिद्धेश्वर मंदिरातील खांबाशी बसून श्री निवृत्तीनाथांना ज्ञानेश्वर माऊली हे भाष्य अर्थात ज्ञानेश्वरी सांगत गेले. पुढे श्री संत एकनाथांनी या ज्ञानेश्वर माऊलींच्या उपलब्ध ज्ञानेश्वरी प्रतीचे शुद्धीकरण केले. श्री गीतेतील श्लोक आणि श्री ज्ञानेश्वर माऊली कथित ज्ञानेश्वरी-ज्ञानेश्वरीतील ओव्या ह्यांची सांगड कुणा महात्म्याने घातल्यावरच श्री ज्ञानेश्वरीची ही प्रत त्या काळात प्रचारात आली होती.

श्री तुकाराम महाराजांनी तर श्री ज्ञानेश्वरीच्या प्रत्येक ओवीवर अभंग रचलेले आहेत. ती पोथी वाटेगावच्या कै. गोविंद महाराजांकडे होती. त्यावरची त्यांनी केलेली निरूपणे आठवताना 'किंबहुना पांडवा। हा अग्निप्रवेशूनीच नव। भातारेविण करावा। तो हा योगू।।१२-६६' हे शब्द माऊलींचे तर रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन। असे शब्द तुकाराम महाराजांचे. भागवत संप्रदायातील सहज सुंदर सुस्पष्ट तरीही गुप्तच असे हे ज्ञान ज्ञानेश्वरीतील ओव्यांनी ये हृदयीचे ते हृदयी घातले. जीवनपथाचा मार्गदर्शक दीपगृह अर्थात श्री ज्ञानेश्वरी। भोळ्याभाबड्या वारकऱ्यांच्या मुखात परंपरेने निनादणारी! पावसच्या वै. स्वामी स्वरूपानंदांची सुंदर अभंग ज्ञानेश्वरी,, वै. प्रा. श्री. के. बेलसरे यांची ज्ञानेश्वरी, निरूपणे ज्ञानेश्वरी आणि भिडे हे नाव जसे गाजले तसेच वै. शैलजाराजे पटवर्धन लिखित ज्ञानेश्वरी मुक्त चिंतन अर्थात त्यातले श्री. ज्ञानेश्वरी ओव्यांचे शब्दश: गद्यांतरही गाजलेलेच! अर्थात हे सांगायला नको की श्री ज्ञानेश्वरीची भाषांतरे जगभरातील अनेक भाषांतून झाली आहेत.

संत जनाबाई म्हणतात ज्ञानाचा सागर। सखा माझा ज्ञानेश्वर। केवळ संतांनाच नव्हे तर जनसामान्यांना गेली सातशे वर्षे ज्ञानोबा माझा, माझी माऊली असे म्हणावेसे वाटते. माऊलींच्या शब्दात सांगायचं तर गीता पाठकासी असे। फळ अर्थ ज्ञाचि सरिसे। गीता माऊलीचे कीनसे। जाणे तान्हे।। माणुसकीचा धर्म जागृत ठेवण्यासाठी ग्रंथरूपाने आजही लाखो भाविकांना हा ग्रंथ मार्गदर्शन करीत आहे. श्री ज्ञानेश्वरीतील प्रत्येक ओवीच्या गद्यार्थाची उकल करणारी निरूपणे या ग्रंथरूपाने प्रकाशित होत आहेत. ज्ञानेश्वरीतील ओव्या समजणारे भावमधुर दाखले आणि काळजात घर करणारे लयबद्ध काव्य यातून ही 'सुबोध अनुष्टुप ज्ञानेश्वरी' साकारली आहे. तिचे लेखक-कवी प्र. सि. मराठे सांगतात की, या लिखाणाने ज्ञानेश्वरीच्या अंतर्गृहात प्रवेश झाल्याची' भावोत्कटता मी अनुभवली. ही ज्ञानेश्वरी लिहिण्याआधी मराठे रेल्वेमध्ये होते. १९९९ मध्ये त्यांना अचानक स्वप्नात श्रीकृष्णाचा दृष्टांत झाला. त्या आशीर्वादपर प्रेरणेचे त्यांनी 'सद्धर्म' या त्रैमासिकासाठी लिखाण सुरू केले. ते लिहिता त्यांनी श्रीमद्भगवद्गीतार्ध हे गीतेचे समश्लोकी भाषांतर केले. श्री. गोंदवलेकर महाराजांच्या कृपाप्रसादाने श्री गोंदवलेकर नामगीता व श्री. गोंदवलेकर महाराजांची दैनंदिन प्रवचने समश्लोकीत केली. त्यानंतर विष्णुसहस्रनाम भावार्थ. ज्ञानेश्वरी नित्यपाठ, अनुष्टुप ज्ञानेश्वरी (कलशाध्याय) असे त्यांचे ग्रंथ २००३ ते २००८ या कालावधीत केशव भिकाजी ढवळे प्रकाशनानेच प्रकाशित केले आणि त्यांना अभ्यासकांप्रमाणेच विद्‌तजनांकडूनही मोठी दाद वाचकांप्रमाणेच मिळत गेली. आजच्या काळातले वाचक ७००वर्षांपूर्वी लिहिलेली ज्ञानेश्वरी वाचतात. पण त्यांना त्यातील भाषा अवघड वाटते. त्यामुळे मराठे यांनी ती सोपी, समजेल अशा भाषेत लिहिली आहे. अनुष्टुपछंदात त्यांनी ही ज्ञानेश्वरी लिहिली आहे. या 'श्रीमत सुबोध अनुष्टुप ज्ञानेश्वरी' मध्ये मूळसंहिता आणि गद्य निरूपण आहे. वाचकाला मूळ ओव्यांतील रसास्वाद तर घेता येणारच आहे. त्याचबरोबर या मूळ ओव्यांचा आशयही अनुष्टुपछंदातील काव्यरूपात बांधल्याने गुणगुणता येईल.

या ग्रंथाच्या अखेरच्या भागातील तीन परिशिष्टात या लेखकाने ग्रंथसमाप्तीनंतर ज्ञानेश्वर माऊलीकडेच केलेली प्रसाद याचना अर्थात आजच्या काळानुरूप भावाभिव्यक्ती करणारे पसायदान आहे. १२५ श्लोकांमध्ये केलेली गीतेवरची संक्षिप्त टीका अर्थात गीताज्ञान नवनीत आहे. अनन्यभक्तीने अशिक्षित स्त्रियासुद्धा ब्रह्मप्राप्तीस प्राप्त करू शकतात, हा सिद्धांत सुस्पष्ट करणारी उद्धववर्ग परिहार पासष्टी या शीर्षकाची अनुष्टुप छंदातीलच कृष्णलीलेची मार्मिक कथा आहे. मूळ श्रीमद्भागवत ग्रंथात असलेली ही कथा या ग्रंथात अनुष्टुपछंदात वाचताना वाचकांना नक्कीच अधिक आवडेल.

लेखकाने ज्ञानेश्वरीच्या नऊ हजार ओव्यांचे या अनुष्टुप श्लोकांना अप्रतिम रूपांतर केले आहे. तेही वयाच्या ७८व्या वर्षी. ते वाचताना वाचकांना आचार्य विनोबांच्या गीताई इतकाच आनंददायी अनुभव येईल. उदाहरण द्यायचे तर मूळ ज्ञानेश्वरीतील ओवी वाचूनि देते घेते आणिक। निभ्रांत नाही सम्यक्त। एथ कर्मचि फळसूचक। मनुष्यलोकी।।७३।। या ओवीचे अनुष्टुप छंदातील रूपांतर पहा -

कर्माविना नसे येथे कुणी दाता नि ग्राहक।
मृत्युलोकी असे कर्म एकचि फलदायक।।७३।।

अशी सुस्पष्ट अर्थ ठसवणारी मालिकाच या ग्रंथात जमून आली आहे.

या ग्रंथातील प्र. सि. मराठे यांचा ज्ञानेश्वरीचे

Marathe Pratishthan

आगळेवेगळे माहात्म्य सांगणारा प्रदीर्घ लेख अनेक विवाद्य आणि गूढ विषयांचा परस्पर सापेक्षता, ज्ञानेश्वरीची शेकडा वर्षे असलेली तळागाळातील जनसामान्यांपर्यंतची लोकप्रियता, ज्ञानेश्वरीचे वेगळेपण सांगणारा, अलंकारयुक्त काव्यरचना असलेला हा अनुष्टुप ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचकांना सुबोध आणि सुखद वाटेल. आस्थेने वाचावा, अभ्यासावा असा तो वाटेल. ही लेखनशैली वाचकांनाही मोहवील अशीच आहे.

**प्रेषक : श्री. प्रभाकर सी. मराठे,**
मुंबई

# १० वी, १२ वी, पदविका, पदवी व अन्य परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन.

गुणवत्ता पारितोषिके २०११-२०१२ साठी ३० ऑगस्ट पूर्वी अर्ज पाठवावे

१०वी (किमान ७०% गुण), १२वी (किमान६०% गुण) पदकि, पदवी व पदव्युत्तर परीक्षा, तसेच विज्ञान, गणित, स्कॉलरशिप व व्यावसायिक-स्पर्धा परीक्षा यामधील गुणवत्ताधारक आणि क्रीडा, संगीत, नाट्य, अभिनय इ. अभ्यासेत्तर क्षेत्रात किमान जिल्हा स्तरावर विशेष नैपुण्य मिळवणारे कुलबांधव यांना प्रतिष्ठानतर्फे गुणवत्ता पारितोषिके दिली जातात.

याशिवाय कुलबांधवांनी प्रायोजित केलेली पारितोषिकेही देण्यात येतात :

**१. कै. कु. अनिता खांबेटे पारितोषिके** : इ. १०वी, १२वी, पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ. ७वी.) या परीक्षात मराठे परिवारात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या प्रत्येकी रु. २५०/-

**२. सौ. सुलभा अनंत प्रायोजित पारितोषिके :** इ. १० वीच्या परीक्षेत १००मार्कांच्या हिंदी विषयात मराठे परिवारात सर्वाधिक गुणांसाठी रु.१००

**३. प्रभाकर गणेश प्रायोजित पारितोषिक** : रु.५०० - पात्रतेचे निकष -

अ. तांत्रिक विषय देऊन (vocational) १०वी च्या परीक्षेत मराठे परिवारात सर्वाधिक गुण

ब. १०वीला तांत्रिक विषय नसले तरी १० वी नंतर मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक, कॉम्प्युटर इंजिनियरिंग यासारख्या आभियांत्रिकीच्या कोणत्याही विद्याशाखेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी १०वीच्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवणारा विद्यार्थी/ विद्यार्थिनी

क. मात्र १० वीला अभियांत्रिकी विषय घेणाऱ्यास अग्रक्रम देण्यात यावा.

**४. शालिनी धुंडिराज प्रायोजित वैदिक शिक्षण अथवा हिंदूधर्माचा प्रचार यासाठी** - वार्षिक पुरस्कार रु.१०००

**५. शैक्षणिक कर्ज -**

विनय खांबेटे स्मृती योजनेतून मेडिकल/इंजिनिअरिंग शिक्षणासाठी बिनव्याजी कर्ज (रु.३०,०००पर्यंत) दिले जाते.

गुणवत्ता पारितोषिके/बिनव्याजी कर्ज यासाठीचे अर्ज १५ ऑगस्ट २०१२ पर्यंत प्रतिष्ठानकडे पाठवावे. अर्ज फक्त २०११-२०१२ या वर्षी झालेल्या परीक्षांबाबत असावे. स्वत: विद्यार्थी अथवा त्याचे/तिचे पालकांपैकी कोणी प्रतिष्ठानचे सभासद आहेत की नाहीत हे नमूद करावे.

निकालाच्या प्रमाणपत्राची प्रत अर्जाला जोडून पाठवावी, नुसतीच प्रमाणपत्राची प्रत पाठवू नये. खास बक्षीस योजनेखाली (उदा. हिंदी अथवा तांत्रिक विषय) अर्ज केला असल्यास तसा उल्लेख अर्जात करावा.

पत्रोत्तर देण्यासाठी अर्जात पूर्ण पत्ता लिहावा.

## शैक्षणिक, वैद्यकीय मदत

गुणवत्ता पारितोषिकांप्रमाणेच प्रतिष्ठानतर्फे कुलबांधवांना शिक्षणासाठी तसेच आजारपणात मदत केली जाते. उत्पन्नाचा निकष न लावता गरजेचा प्राधान्याने विचार करून अशी मदत दिली जाते.

बायपास, कॅन्सर यासारख्या मोठ्या आजरासाठीही खास निधीतून (विशिष्ट हेतू निधी) मदत मिळू शकते.

शैक्षणिक मदतीसाठी, वैद्यकीय खर्चासाठी आणि गरजू वृद्धांना साहाय्यासाठीही कुलबांधवांनी नि:संकोचपणे प्रतिष्ठानला लिहावे.

## मानसन्मान

चि. अमोघ रविंद्र मराठे याला २०११च्या माध्यमिक शालांत परीक्षेत ९८.५५% मार्कस मिळाले. यशोधन हायस्कूल, गोरेगाव मुंबई या शाळेत त्याचा पहिला नंबर आला.

मराठे प्रतिष्ठानद्वारा चि. अमोघचे हार्दिक अभिनंदन. पुढील शिक्षणातही असेच भरघोस यश मिळो ह्या शुभेच्छा!



Marathe Pratishthan

# माझी बायपास

**श्री. अ. द. मराठे (पृ.२७०)**

मी गुंगीतून बाहेर पडलो आणि डोळे उघडले तेव्हा मला जाणवले की माझ्या छातीपासून उजव्या जांघेपर्यंत नळ्या खुपसल्या आहेत. आरामखुर्चीत झोपवावे तसे मला बिछान्याचा मागील भाग वर उचलून झोपवले आहे. वेळ काय झाली आहे याचा अंदाजच येत नव्हता. मी शुद्धीवर आल्याची चाहूल सौ. सूर्याला येताच ती तत्परतेने जवळ आली. माझ्या कपाळावर हात ठेवून ''कसे वाटते?'' विचारले. माझे 'जेवणखाण' सलाईनच्या बाटलीतूनच झाले होते. डोळ्यांवरची झापड दूर झाली नव्हती. मी पुन्हा गुंगीत गेलो.

मी डोबिंवलीच्या शाळेतून सेवानिवृत्त झालो. त्या पूर्वीच तळेगाव दाभाडे येथे एक ब्लॉक घेतला होता. सर्व ग्रंथसंग्रह तिकडे हलवला होता. आम्ही सात सख्खी भावंडं तळेगावला एकमेकांकडे सहज आठ-दहा मिनिटात जाता येईल अशा अंतरावर 'दूर राहून जवळ' अशी राहतो. सूर्याची पोस्टाची एजन्सी असल्यामुळे ती पोस्टाची कामे पूर्ण झाली की तळेगावला येत असे. मला पित्तविकार, अपचन सततचे होते. आमची भाची सौ. इला करंदीकर-भोर आयुर्वेद विशारद आहे. तिच्या औषधांनी मला बरे वाटत होते. पित्ताचा त्रास जवळ जवळ शून्य झाला होता. पण एकदा मला जाणवले की दुपारच्या जेवणानंतर थोडा वेळ छातीखाली जळजळते. वजन कमी कमी होत पन्नास किलोवरून सेहेचाळीस-पंचेचाळीस वर आले. मी हे सांगितल्यावर तिचा चेहरा एकदम चमत्कारिक झाला. ती पटकन म्हणाली, ''मी तुला काही टेस्ट लिहून देते. पुण्याला जाऊन त्या करून घे.'' मात्र आम्हाला पुण्यापेक्षा डोबिंवली सोयीचे वाटले. इथे आमची हक्काची जागा आहे आणि डॉक्टर जुन्या परिचयाचे आहेत. त्यांनी त्या टेस्टमध्ये 'स्ट्रेस टेस्ट' सांगितली. या टेस्टमध्ये वॉकिंग मशीनसारखे मशीन असते. त्यावर वेगवेगळ्या गतीने चालणे धावणे करून घेतात. टेस्ट करण्यापूर्वी घरून येताना काहीतरी खाऊन यायला सांगतात. ते अत्यंत आवश्यक असते. कारण टेस्टनंतर चांगल्यापैकी दमायला होते.

या परीक्षेचा निकाल डॉक्टरांनी सूर्याला आपल्या केबिनमध्ये बोलावून सांगितला. का? तर मला धक्का बसेल! सूर्याने सांगितले,''आम्ही दोघंही मनाची खंबीर आहोत. काय असेल त्याला सामोरे जाऊ'' डॉक्टर म्हणाले, ''हृदयविकाराची चांगलीच लक्षणे दिसतात. लौकरात लौकर तज्ज्ञाचा सल्ला घेऊन, हॉस्पिटलमध्ये भरती होऊन अँजिओग्राफी करून घ्या. ...येथे गेल्यास शस्त्रक्रियेपर्यंत सर्व काही होईल.''

आम्ही त्याला अनसरून डोबिंवलीतील एका हॉस्पिटलमध्ये दाखल झालो. अँजिओग्राफीत उजव्या जांघेतून एक नळी सरकवीत हृदयाजवळ नेतात. त्यातून कॅमेरा सरकवीत नेतात. हृदयाचे आवश्यक तेवढे फोटो काढतात आणि नळी एका फटक्यात भसकन बाहेर काढतात. जखमेतून रक्ताचा तुंबाडा सुरू झाला. डॉक्टरांनी तो भाग चिमटीत पकडून दाबून धरला. सात-आठ मिनिटांनी दाब कमी केला. रक्त थांबले नव्हते. आता डॉक्टरांनी आपल्या शरीराचा सर्व भार त्या जखमेवर टाकून ती दहा मिनिटे दाबून धरली. मी तडफडत होतो. डॉक्टरांनी दाब काढला. रक्त साकळले होते. लगेच मलमपट्टी झाली. मी मात्र घामाने निथळत होतो. हृदयाच्या शस्त्रक्रियेच्या तज्ज्ञांशी बोललो. त्यांनी हॉस्पिटलचे नाव विचारले आणि सांगितले, ''हे फक्त तिथेच घडते कारण तिथे उपकरणेसुद्धा आधुनिक नाहीत.''

दुसऱ्या दिवशी सूर्या आमच्या नेहमीच्या डॉक्टरांना सर्व सांगायला गेली. तिथे धक्कादायक माहिती कळली. त्या ठिकाणी यशस्वी शस्त्रक्रियांची संख्या अत्यल्प आहे, कारण तिथे कर्मचारी वर्ग अगदी सामान्य दर्जाचा आहे. चांगला डॉक्टर टिकत नाही. पैसा मात्र अचाट घेतला जातो. हे ऐकल्यावर सूर्याने परिचित ठिकाणी चौकशा केल्या आणि सर्वानुमते ठाण्याला जायचे ठरले. आमचा निर्णय डॉक्टर मान्य करायला तयार नव्हते आणि मुख्य म्हणजे अँजिओग्राफीची सीडी द्यायला नकार दिला. त्यांना खूप मनस्ताप झाला. पण त्यांना त्या रुग्णालयाची प्रसिद्धी माहिती होती. त्यांनी नाइलाजाने आम्हाला सोडले. पुढे संधी मिळताच ते स्वत:ही दुसरीकडे निघून गेले. त्यांचा निर्णय योग्य होता. ते स्वत: अत्यंत कुशल होते.

ठाण्याला ज्युपिटरमध्ये भरती झालो. चि. विभावरी आणि जावई शशांक हे ठाण्यातच राहत असल्याने त्यांचीही मदत खूप झाली. हॉस्पिटलमध्ये भरती झाल्याक्षणापासून पुढे माझा कार्यक्रम एकतर झोपून राहणे आणि तपासण्यांसाठी व्हीलचेअरवरून जाणे. ते काम रुग्णालयाचा सेवकच करायचा. पहिल्या दिवशी मला एका डॉक्टरबाईंकडे नेले. त्या बोलक्या हसतमुख होत्या. ''मी इथे भूलतज्ज्ञ म्हणून काम करते. त्याशिवाय मी एम.डी. पण आहे. ती प्रॅक्टिस मी घरी करते. मला तुमची मेडिकल हिस्ट्री हवी आहे.'' कोणते आजार कधी कधी झाले. ॲलर्जी कसली आहे पूर्वी कोणकोणत्या शस्त्रक्रिया झाल्या आहेत असे सगळे सगळे विचारून लिहून घेतले. मग म्हणाल्या, ''आता तुम्हाला काय विचारायचे असले तर विचारा.'' मी सांगितले, ''पाठीच्या मणक्यात इंजेक्शन देऊन भूल देतात त्याची मला अतिशय भीती वाटते. ते देण्यात तुम्ही कुशल आहात ना?''

''तो रानटी प्रकार आता इतिहासजमा झाला आहे. मी तुम्हाला भूल कधी देईन हे कळणारसुद्धा नाही.'' (भूल शब्द त्यांचा!) ऑपरेशनला अजिबात घाबरू नका. आणि काळजी करू नका.''

यावर मी म्हणालो, ''तुम्ही सर्व डॉक्टर जे काही करणार आहात ते सर्व माझ्या भल्यासाठीच. त्यात घाबरायचं कशाला? त्यात थोडा त्रास झाला तरी मी तो सहन करीन.''

हे ऐकताच डॉक्टरबाईंनी माझ्या पाठीवर शाबासकी दिली (त्या माझ्यापेक्षा किमान पंधरा

Marathe Pratishthan

वर्षांनी लहान होत्या. त्या म्हणाल्या, माझ्या पंचवीस वर्षांच्या प्रॅक्टिसमध्ये हे उत्तर मी प्रथमच ऐकते आहे. इतक्या पॉझिटिव्ह ॲटिट्यूडचा पेशंट तुम्ही एकमेव! इतरांची समजूत घालताना आमच्या नाकात दम येतो. ऑपरेशन टेबलवर रडारड थांबवावी लागते. तुमच्या या स्वभावामुळे तुमचे ऑपरेशन अत्यंत यशस्वी होईल. (हा पॉझिटिव्ह ॲटिट्यूड माझ्या मुलींचा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सूर्याचा आहे.)

दुसऱ्या दिवशी त्या ऑपरेशन टेबलजवळ आल्या. मी त्यांना 'गुडमॉर्निंग डॉक्टर' म्हणालो, ''कसं वाटतं? मी लवकरच तुम्हाला भूल देईन. काळजी करू नका.''

''तुम्ही सर्व मिळून माझं भलं करणार आहात. माझी काळजीही तुम्हीच घेणार आहात.'' मी उत्तर दिलं. डॉक्टरीण बाईंनी भूल कशी दिली ते त्यांचं त्यांनाच ठाऊक! माझं वाक्य पूर्ण झाल्याचं फक्त मला आठवतं.

शस्त्रक्रिया सहा-तास चालणार होती. सूर्या आणि विभावरी काळजी, उत्सुकता यांच्या दडपणाखाली होत्या. मध्ये एकदा त्या आळी-पाळीने कँटिनमध्ये जाऊन काहीतरी खाल्ल्यासारखं करून आल्या. तीन-चार तासांनंतर चहा पिऊन आल्या. उरलेल्या सर्व वेळात त्या केवळ 'ऑपरेशन ईज गोइंग ऑन' या बोर्डाकडे बघत होत्या. शेवटी 'ऑपरेशन सक्सेसफुल' बघितल्यावर दोघींच्याही गालांवर आनंदाश्रू ओघळले.

ऑपरेशनला साधारण चार-पाच दिवस झाल्यावर दुपारी एक बाई आल्या. त्या म्हणाल्या, ''मी तुम्हाला चालायला शिकवायला आले आहे.'' मला एकदम हसायला आले. त्या म्हणाल्या, ''गंमत वाटली ना? पण बघा हा मागे यायचं नाही.''

माझं वय चौसष्ट. आणि मी शाळामास्तर होतो. इथले सगळेच कर्मचारी माझे विद्यार्थी शोभतील असे. त्यामुळे सर्वांशी माझं अगदी छान जमत होतं. या बाईही तशाच होत्या. त्यांनी मला उठून बसवलं. अंगावरच्या दोन नळ्यांच्या टोकांना दोन पिशव्या होत्या. त्या कॉटखाली अडकवलेल्या होत्या. त्यात लाल रंग दिसला. त्या अर्थी थोडं रक्त त्यात जमा होतं आणि इतर काही बॉडी फ्लुईड्स होती. त्याचं लटांबर त्यांनी माझ्या एका हातात दिलं. मला खाली उतरून उभं केलं. आणि म्हणाल्या, ''चला फिरायला.'' हॉस्पिटलच्या कॉरिडॉरमध्ये मी पहिलं पाऊल टाकलं नि लटपटलो. बाईंनी तत्परतेने दंड धरून सावरलं. मग खाली बघून चालायला लागलं की आपली पावलं स्थिर आहेत आणि फरशी मागे जाते असंच वाटायला लागलं. वर बघून चालायचं म्हटलं की पावलंच हलेनात. बाई म्हणाल्या ''बघा, तुम्ही चालणं विसरलात! पण उद्यापासून वहिनींना बरोबर घेऊन चाला. मी फक्त आजच आले आहे. आता आपणला जिना चढायचा आहे. जिन्याजवळ जाताच त्यांनी आपल्याजवळच्या गॅजेटला जोडलेला नळीच्या टोकाचा चिमटा माझ्या बोटाला जोडला. लगेच त्यातून डब् डब् असे तालबद्ध आवाज यायला लागले. पाच-सहा पायऱ्या मी व्यवस्थित चढलो. आणि बाईंनी मला शाबासकी दिली. ''छान! तुमचा रक्तदाब, हृदयाचे ठोके सर्व काही नॉर्मल आहे. आता परतूया.'' परत आल्यावर त्यांनी मला नळ्या, पिशव्या जागच्या जागी लावून बिछान्यावर झोपवलं. थोडी विश्रांती दिली. आणि श्वसनाचे काही व्यायाम दिले. श्वास पाच सेकंद रोखून धरणे, दीर्घ श्वसन, नाकाने श्वास घेऊन तोंडाने सोडणं असे ते व्यायाम होते. त्यांचे क्रम आणि पद्धत सूर्याला सांगितली आणि मला चालवण्याची आणि श्वसनाचे व्यायाम देण्याची जबाबदारी सूर्यावर सोपवून त्या गेल्या.

आता सकाळी एक नर्स यायची. ती माझ्या नाकावर एक मास्क लावायची. त्याला एक नळी जोडलेली होती. त्या बाटलीतील द्रवाला हीटरने उष्णता देताच ते उकळल्यासारखे होऊन त्याचा वाफारा नाकात आला. तो जोराने श्वास घेत ओढायचा होता. दररोज बाटलीची संख्या वाढत शेवटी पाचपर्यंत गेली आणि नंतर बंद झाली. नंतर एका किटलीत गरम पाण्यात एक औषध घालून आणले. किटलीची तोटी तोंडात धरून त्याचा वाफारा अर्धा तास घ्यायचा होता. हे सर्व उपाय छातीत कफ होऊ न देण्याचे आणि झालेला बाहेर काढण्याचे होते. पुढची पायरी म्हणून एक उपकरण आणून दिले. त्याची नळी तोंडात धरून जोराने हवा आत ओढायची. लगेच आतील एक दट्ट्या वर उचले. तो किती वर आला याचे मोजमाप दाखवणारे आकडे होते. हा व्यायाम मात्र फार अवघड गेला. कितीही जोरात हसा आत ओढली तरी दट्ट्या एकच आकडा वर जायचा. नर्स तो पाचावर न्यायला सांगायची. अक्षरश: दमछाक व्हायची. मी या उपकरणाला बिनतंबाखूची गुडगुडी हे नाव दिलं. दररोज नर्स विचारायची, ''गुडगुडी ओढून झाली? दिवसातून किती वेळा ओढली?'' एक डॉक्टर तर ओरडायचे, ''फक्त तीनदा? दिवसातून शंभरदा गुडगुडी ओढा. ते उपकरण घरी घेऊन जायचे होते. घरी मी ती गुडगुडी दिवसातून तीनदा प्रत्येक वेळी दहा वेळा अशी ओढेपर्यंत प्रगती केली. हा सर्व फुप्फुसांचा व्यायाम होता.

मला एक विकार आहे. तो म्हणजे भर उन्हाळ्यातसुद्धा मला एकदम थंडीची हुडहुडी भरते. ब्लँकेट अंगाभोवती घट्ट गुंडाळून तास दीड तास तरी पडून राहावे लागते. हाच विकार एकदा हॉस्पिटलमध्ये उद्‌भवला. त्या दिवशी सूर्याला विश्रांती द्यायला म्हणून जावई शशांक आला होता. मी 'थंडी थंडी' ओरडताच शशांकने स्वत:च्या अंगावरचे ब्लँकेट माझ्या अंगावर टाकले. पण आज पहिल्यांदाच मला नुसती थंडी न वाजता आचके येऊन शरीराची कमान व्हायला लागली. शशांकने लगेच काऊंटरवरील रात्र-पाळीच्या डॉक्टरांना सांगितले. त्यांनी तात्काळ डॉक्टरांना हकीगत कळवली. डॉक्टरांनी मलेरियल ॲटॅक सांगून त्यावरील इंजेक्शन द्यायला सांगितले. हे अवघ्या पाच मिनिटात होऊन मला इंजेक्शन दिले गेले. हळूहळू मला बरे वाटून झोप लागली.

आता छातीवरील नळ्या आणि त्यांना जोडलेल्या पिशव्या जांघेत खुपसलेल्या नळ्या एकेक दिवसाने कमी होत होत्या. डाव्या हातावर कोपरापासून पंजापर्यंत बँडेज होते. त्या हातातून चार रोहिण्या काढून खराब झालेल्या जागी जोडून रक्तप्रवाहाची दिशा बदलली होती. हीच ती बायपास शस्त्रक्रिया! शस्त्रक्रिया करणारे एक डॉक्टर आले. त्यांनी बँडेज सोडून बघितले. जखमा अजून नीट भरल्या नव्हत्या. त्यांनी औषध लावून लांबलचक कापूस लावला आणि त्यावरून गमपट्ट्यांचे तुकडे लावून ठेवले. ती जखम लवकरच भरली आणि डॉक्टरांनी येऊन टाके तोडून टाकले आणि उद्या डिसचार्ज द्या म्हणून सूचना दिली. दुसऱ्या दिवशी सर्व सोपस्कार होऊन मी ठाण्यालाच मुलीच्या जागेत राहायला



Marathi Pratishthan

गेलो. तिथे दहा दिवस मुक्काम होता. त्या काळात तीन-चार वेळा हॉस्पिटलमध्ये जाऊन आलो.

विभावरीकडच्या मुक्कामात मजा आला. जावई शशांकचे सर्व उच्च शिक्षण अमेरिकेत झाले. मात्र अमेरिकेतील जीवन, कौटुंबिक व्यवस्था त्याला अजिबात आवडत नाही. तो शिक्षण संपताच भारतात आला. त्याला शिवचरित्र, शिवशाही यांचे फार आकर्षण आहे. ब. मो. पुरंदरे, गो. नी. दांडेकर यांनी लिहिलेली शिवचरित्रे त्याच्या संग्रही आहेत. या पुस्तकांच्या इतिहास म्हणून मर्यादा किती याची आणि मूळ इतिहास यावर आमची चर्चा चाले. मी त्याला वास्तव इतिहास कसा वेगळा असतो हे सांगितले. त्यांच्याकडच्या मुक्कामात वेळ कसा गेला कळले नाही. अखेर आमची डोबिंवलीला परतण्याची तयारी झाली. घरी आलो आणि जो काही आनंद झाला. शेजारीपाजारी खुशाली विचारायला आले. आता सूर्याच्या साथीने नवे जीवन सुरू झाले.

**- अ. द. मराठे (पृ.२७०)**

६ मंजूषा, विकास हाऊसिंग सोसायटी, शास्त्रीनगर,
डोबिंवली (प.) ४२१ २०२

## Prakashzot

### Mukund Marathe (पृ.३६९) .versatile in music and in field of science …astronomy..space sciences
### (Shri Mukund Marathe, Vice President, Sanskar Bharati, Konkan Region)

Being the son of late Sangeet Bhushan Pandit Ram Marathe, it was natural that Mukund should have music in his genes. He is gold medalist in M.Sc. Maths,Mumbai university, Diploma in Computer Management and Programming. He has studied astronomy in depth and regularly conducts lectures at Mumbai University and Nehru Planetorium, Worli and various institutes for last 25 Years. He has been an active participant in organizing cultural programmes at Nehru Centre. Last year in 2010 he visited NASA U. S. A. and observatories in California for observational studies in astonomy and space sciences. For 2 months..

Despite a professional career spanning 20 years, he has not forgotton his musical roots. He has passed the Sangeet Visharad and Tabla Visharad examinations with flying colours.

He has had the privilege of learning Classical Music at the feet of Ulhas Kashalkar and Shri Shashikant Oak, apart from his father. He has obtained guidance for light vocal music from Prabhakar Pandit, Yashwant Deo, Pandit Govindrao Patwardhan and Snehal Bhatkar. He has learnt the finer points of the Tabla from Pandit Pandharinath Nageshkar and Pandit Bhai Gaitonde and the “Pakhwaj” from the late Pandit Arjun Shejwal. He has also acted in various musical dramas.

He has thrice received the silver medal for best singer-actor from the Govt. of Maharashtra. He has also won the first prize in classical and light vocal music at various competitions .

Acted in a main role old and new musical dramas ….. like matsyagandha, saubhadra, sharada, teen paishacha tamasha, mruchhakatik , meghmalhar, duniya rang-rangili, sanshay –kallol,etc…

All india radio B high grade artist and performed various progs on various channals.

He is great demand as a judge for various music competitions at university.and other places. He has also written many articles on music and science for various publications. He runs an organization called “Naadbramha” which organizes many musical events.

Felicitaed with so many musical and scientific awards all over country as well as abroad..

His daughter Kum. Swarangi has followed his footsteps in the field of music.and acting…

## व्रतबंध : चि. स्वानंद जितेंद्र जोशी

श्री. सदाशिव गोपाळ जोशी यांचा नातू आणि श्री. जितेंद्र सदाशिव जोशी यांचा मुलगा चि. स्वानंद याचा व्रतबंध दिनांक २६ फेब्रुवारी २०१२ ला फडके हॉल, ग्राहकपेठेजवळ, पुणे येथे थाटामाटात संपन्न झाला.

मराठे प्रतिष्ठानद्वारा चि. स्वानंदला अनेकोत्तम शुभाशीर्वाद.

(श्री. सदाशिव गोपाळ जोशी यांनी आपला कुलवृत्तांत जेव्हा नवीन तयार करण्यात आला तेव्हा ठाण्यातील २००च्या वर कुलबांधवांच्या घरी जाऊन माहिती गोळा केली होती.) त्यांचे घराणे नंबर ११० आहे.



Marathe Pratishthan

# निवृत्ती दातारे... संत निवृत्तीनाथ

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०)**

> गहिनीनाथांच्या उपदेशाने आणि गुरुकृपेमुळे ज्यांनी भागवतधर्माची गंगा महाराष्ट्रात सर्वदूर पसरली. ज्ञानेश्वरीसारखा अमौलिक ग्रंथ लिहिण्यास प्रेरणा दिली अशा श्रीगुरुनिवृत्तीनाथांवरील 'निवृत्तिदातारे' हा लेख 'हितगुज'च्या वाचकांसाठी सादर करीत आहोत.
>
> \- संपादिका

संत निवृत्तीनाथ : (शके ११९५-१२१९ इ.स. १२७३ ते १२९७)

जगदोद्धार करण्यासाठी व जगताला प्रभावीपणे भक्तीमार्गाची शिकवण देण्यासाठी शके ११९७मध्ये महाविष्णूने श्रीज्ञानदेवांच्या रूपाने आळंदी येथे संतस्वरूपात अवतार घेतला. दुष्टसुद्धा सज्जन बनावा अशी संतांची धारणा असते. 'जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो।' असे संतांच्या अवताराचे पूर्ण विधायक स्वरूप असते आणि म्हणूनच देवाच्या अवतारापेक्षा संतांच्या अवताराचे महत्त्व विशेष आहे.

महाविष्णूच्या ह्या ज्ञानदेवरूपाने होणाऱ्या संतकार्यात सप्रेम भाग घेण्यासाठी व मुख्यत: ह्या संतकार्यास फार मोठी प्रेरणा देण्यासाठी श्रीशंकराने निवृत्तीनाथांच्या रूपाने ज्ञानदेव प्रकट होण्यापूर्वीच शके ११९५मध्ये अवतार घेतला.

## निवृत्तीदादा वाट चुकले -गुरुंचे दर्शन

गुरुदेव रामानंद यति यांच्या आज्ञेमुळे विठ्ठलपंतांनी संन्यासाश्रम सोडून गृहस्थाश्रमात प्रवेश केला. अर्थात आळंदीकरांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकला. हे बहिष्काराचे संकट नाहीसं व्हावे - आपल्या अंगी अधिकाधिक पवित्रता यावी, शुद्धता यावी ह्या हेतूने तीव्र अनुष्ठान करण्यासाठी विठ्ठलपंत आपल्या ज्ञानदेवादी बालकांना घेऊन त्र्यंबकेश्वरी गेले. तिथे रोज मध्यरात्री कुशावर्ती स्नान करून विठ्ठलपंत निवृत्ती, ज्ञानदेव सोपान ह्या मुलांसह ब्रह्मगिरीस प्रदक्षिणा करीत. एके दिवशी मध्यरात्री प्रदक्षिणा करीत असताना वाघाची डरकाळी त्यांना ऐकू आली व वाघ आपल्या अंगावर धावून येत आहे असे दिसताच वडील विठ्ठलपंत निवृत्तीरायदी बालकजन भावंडे ह्या सर्वांनी पलायन केले. विठ्ठलपंतांची व निवृत्तीची चूकामुक झाली. पळापळीत निवृत्ती वाट चुकला. योग्य वाट सापडण्यासाठी त्याची वाट चुकली असावी. तो एका गुहेत शिरला. तिथे गहिनीनाथ तपाचरणात मग्न होते. मस्तकी जटा, कानी कुंडले, कंठात शैली, हातात शिंगी व पुंगी धारण केली होती. गहिनीनाथांचे ते तेजस्वी तरीही लोभस रुपडे पाहून निवृत्ती लोभावले. आपल्या समोरील तेजस्वी बालक पाहून गहिनीनाथही संतुष्ट झाले. त्यास त्यांनी बोध केला. सात दिवस निवृत्ती गुहेतच होता. गहिनीनाथांकडून त्यास योगमार्गाची दीक्षा मिळाली. गहिनीनाथ, नाथपरंपरेतील,

*''आदिनाथ गुरू सकळ सिद्धांचा ।*
*मत्स्येंद्र तयाचा मुख्य शिष्य ।*
*मत्स्येंद्राने बोध गोरक्षासी केला ।*
*गोरक्ष वोळला गहिनीप्रति ।*
*गहिनीप्रसादे निवृत्तीदातारे ।*
*ज्ञानदेवा सार चोजविले ।।'*

या गुरूपरंपरेप्रमाणे निवृत्तीदादा निवृत्तीनाथ झाले. गहिनीनाथांनी त्यांना नाथपरंपरेत सामील करून घेतले खरे पण त्यांना श्रीकृष्णाची उपासना व नामस्मरणाचा प्रसार करण्याची आज्ञा केली.

मातापित्यांच्या देहांत प्रायश्चित्तानंतर ज्ञानेश्वर भावंडांची वाटचाल 'निवृत्तीदादाच्या' मार्गदर्शनाने झाली. निवृत्तीनाथांनी श्रीकृष्णापासनेची दीक्षा आपल्या भावंडांना दिली. ज्ञानेश्वरांना योगसिद्धी व कृष्णाभक्ती अशी अभयविध दीक्षा दिली. या आधारानेच ज्ञानेश्वरांनी योगसिद्धीच्या बळाने रेड्याकरवी वेद वदविले. जडभिंत चालविली आणि श्रीकृष्णोपासना सर्वत्र पसरविण्यासाठी गीताभाष्य अर्थात ज्ञानेश्वरीची रचना केली. भागवत धर्माच्या प्रसाराचे कार्य निवृत्तीनाथांनी ज्ञानेश्वरांकडून करवून घेतले.

## निवृत्तीनाथांची अभंग रचना

श्री. का. अ. जोशी संपादित 'सकलसंत-गाथे'मध्ये श्रीनिवृत्तीनाथांचे एकूण ३५७ अभंग आहेत. निवृत्तीनाथ यांच्या गाथेची सुरुवात पृष्ठ क्रमांक १२६पासून होते व अखेर पृ.क्र. १५८ वर होते. त्यामध्ये पंढरीमाहात्म्य, पंढरीतील काला, बालक्रीडा, संतपर, सद्‌गुरुप्रसाद, उपदेशपर ज्ञानपर अभंगांचा समावेश होतो.

निवृत्तीनाथांच्या अभंगात बाळकृष्ण स्वरूपाच्या मधुर वर्णनाबरोबर तात्त्विक विचारही आढळतात. निराकार ब्रह्मच सगुणरूपाने नंदाघरी आले. कृष्णनाम-भक्तीने देवांना मोक्ष व योग्यांना समाधिसुख लाभले. श्रीकृष्णच वैकुंठपती विष्णू असून शिवदेखील त्याचे ध्यान करतो.

*निराशून्य गगनि अंकुरले एक।*
*ब्रह्मांड कवतुक लीळातून।*
*ते माये वो हरि गोपिका भोगिती।*
*शंखचक्रायुक्त कृष्णमूर्ती।*
*निराभास आस नि:संदेह अपाशा।*
*तोचित हृषिकेश नंदाघरी।*
*निवृत्तीप्रकार ध्यानाचा विचार।*
*सर्वत्र श्रीधर यशोदेचा।*

बाळकृष्णाचे सत्य स्वरूप म्हणजे ब्रह्मरूपी गगनात उगवलेला अंकुरच होय. यशोदेचा कृष्ण सर्वत्र भरलेला असून तो शंखचक्रयुक्त आहे. गौळणी त्याच्या रूपाचे ध्यान करतात. त्याच्यायोगे नंदाच्या घरी ध्यान करतात. त्याच्यायोगे नंदाच्या घरी आनंदाचे साम्राज्य पसरलेले असते. श्रीकृष्ण मूळ परात्पर ब्रह्माचे सगुणरूप आहे. हरीचे रूप, नामाची श्रेष्ठता, दर्शनाचे पावित्र्य वातावरणातील मांगल्य, विठ्ठलभक्त वैष्णवांची निर्मळ भक्ती यासारख्या अनेक छटा श्रीसंतनिवृत्तीनाथांच्या अभंगातून व्यक्त होताना दिसतात. आपल्या अभंगात निवृत्तीनाथांनी गहिनी कृपेचा उल्लेख अनेक ठिकाणी केला आहे. जसे 'निवृत्तीचे ध्येय कृष्ण हाचि होय। गयनि नाथे सोय दाखविली।।

किंवा

*'निवृत्ती संपन्न कृष्णरूप ध्यान।*
*गयनि तल्लीन नाम घेता ।।*

तसेच,



Marathe Pratishthan

*'निवृत्तीचे धन गोकुळी श्रीकृष्ण ।*
*गयनी सहिष्णु प्रेमे डुल्ले।।*
*नाथपंथीय विचारांचा प्रभाव*

श्रीनिवृत्तीनाथांच्या अभंगावर नाथपंथीय विचारांचा व नाथपंथीय परिभाषेचाही प्रभाव दिसतो. निवृत्तीनाथांनी योगशास्त्रातील त्रिकूट व गोलहाट या पश्चिममार्गाचे सविस्तर उल्लेख अभंगात केलेले दिसतात. योगानुभव ही कथन केलेले दिसतात.

श्रीनृिवत्तीनाथांनी स्वत:च्या गोरक्षपरंपरेप्रमाणे अद्वैताचे प्रतिपादन व द्वैताचे खंडन केलेले आहे. या सृष्टीत एकच एक तत्त्व असून श्रीहरी चराचरात्मक अद्वैतरूप आहे. त्याच्या ठिकाणी द्वैताचा अनुभव चुकूनही येत नाही, घरोघरी नांदणारा श्रीहरी एकच आहे व त्याच्या एकत्वाचा बोध होतो तेव्हाच वैकुंठाची प्राप्ती होते असे श्रीनिवृत्तीनाथ म्हणतात. तो श्रीहरी स्वयंभू असून दिवस-रात्र भेदभाव त्याच्याजवळ नाही. सर्व श्रुतींनी याच श्रीहरीचा जयजयकार केला व सनकादिकांनी हेच तत्त्व जाणले. श्रीगुरुगहिनीनाथांच्या अनुग्रहाने मला उन्मनी अवस्था प्राप्त होऊन ब्रह्मपदाचा लाभ झाला हे निवृत्तींनी आवर्जून सांगितले.

अभंगरचनेद्वारा नाथपंथीय विचारांच्या प्रसारकार्याप्रमाणेच अनेकांना नाथपंथीय दीक्षा देऊन अनुग्रहही निवृत्तीनाथांनी केला. ज्ञानदेवांनी निवृत्तीनाथांकडून दीक्षा घेतली. गुरु निवृत्तीनाथांचे मार्गदर्शन व प्रेरणाही त्यांना वेळोवेळी लाभली.

## श्रीनिवृत्तीनाथांचे कार्य

श्रीनिवृत्तीनाथांनी बाळकृष्णोपासनेवर भर देऊन पंढरपूरच्या विठ्ठलसंप्रदायात नवचैतन्य आणले. गोरख-गहिनीपासून प्राप्त झालेल्या शिवशक्ती-सामरस्याचे रहस्य ओळखून निवृत्तीनाथांनी योग व अद्वैताचा प्रसार केला. त्याचबरोबर अद्वैतावर आधारित निर्गुण-सगुण चुणूक देणारे सिद्धांत आपल्या परिवाराला देऊन महाराष्ट्रात हरिहराचे ऐक्य साधले. एवढेच नव्हे, तर पंढरपूरच्या वारकरी-संप्रदायाला सर्वस्वी नवीन वळण लावले. निवृत्तींनी नाथसिद्धांताबरोबर शांकराद्वैताचे विवरण केले. श्रीगुरु गहिनीनाथांकडून प्राप्त झालेल्या श्रीकृष्णभक्तीचा प्रसार केला.

## श्रीनिवृत्तीनाथांचा संदेश

*हरीविण सुटिजे ऐसें नाही बोलिलें।*
*सर्वही शोधिलें शास्त्र आम्ही।।*

संसारबंधातून हरीवाचून सोडविणारा कोणीनाही व हरिभजन हेच सर्व साधनांचे सार आहे. श्रीहरी सर्वभूती वसत असल्यामुळे द्वैतभाव सोडून सर्वभूती अद्वैत हरी पाहा. 'देवोचि दिसतु सर्वाघटी', 'गोपाळ संकलां देहीं नांदे', 'जनीं जनार्दन हेचि खरे', 'सर्वाघटी राम पाहे' इ. सूत्ररूप वाक्यात निवृत्तीनाथांनी हा संदेश सांगितलेला दिसून येतो. कर्मजाड्य अंगी येऊ न देता कर्ममार्गाने चला, अद्वैत हरी जेणे आपला होतो ते सत्कर्म जगाच्या गुणदोषविवंचनेत न पडता वासना, मन, भाव आपला चोख ठेवा. 'मनाची वासना मनेंचि नेमावी। सर्वत्र धरावी विठ्ठलसोय', 'शांतीचे भजन क्षमेचा कळवळा' व 'अहिंसेचे स्वरूप हेच हरिरुप' जाणून सर्वांशी कायावाचामनाने अहिंसाबुद्धीने वागा. तात्पर्य सदाचाराने वागा व अद्वैतभावाचे हरिभजन करा हेच निवृत्तीनाथांच्या संदेशाचे सार आहे.

## निवृत्तीचे बोल लिहिले सोपाने

संतनिवृत्तीनाथांची अभंगरचना गोड, रसाळ व प्रासादिक आहे. उत्कट भावदर्शनाबरोबर मधुर कल्पना व उदात्त विचारांचे अभिनव दर्शन त्यांच्या अभंगातून होते. ज्ञानदेवांच्या ओव्या व अभंग सच्चिदानंदबाबांनी लिहिले तर 'निवृत्तीचे बोल लिहिले सोपाने' अशी संतसेवा दासानुदास, धाकटेबंधू सोपानदेवांनी केली आणि भक्तीचा सुगंध सर्वत्र दरवळून टाकला.

ज्ञानदेव, नामदेव, सेना न्हावी, नरहरी सोनार, सोपानदेव, मुक्ताबाई, जनाबाई आदी सर्व मंडळींनी आपापल्या अभंगांतून निवृत्तीनाथांचा गौरव केलेला आढळतो.

## निवृत्तीनाथांचे व्यक्तित्व गुरु व पालक

श्रीनिवृत्तीनाथांनी ज्ञानेश्वरादि भावंडांची गुरु व पालक अशी उभयविध जबाबदारी उत्तमरितीने पार पाडली. 'किंबहुना तुमचे केले। धर्मकीर्तन हे सिद्धी नेले' अशी ज्ञानेश्वरी निवृत्तीनाथांच्या प्रेरणेमुळे लिहिली गेली. ज्ञानदेवांनी केलेला गुरुगौरव वर्णन करण्याचा होत असलेला मोह आवरता येणे कठीण आहे पण लेखाच्या विस्तारभयास्तव तो आवरला पाहिजे, तो स्वतंत्र लेखाचा विषय आहे. ज्ञानेश्वरीत मूळ गीता-पदार्थाकडे लक्ष देण्यास ज्ञानेश्वरास निवृत्ती वारंवार सांगतात. विस्ताराऐवजी मूळ पदार्थ स्पष्ट करण्याकडे त्यांचा कल आहे. उदाहरणार्थ -

*तंव श्रीगुरु म्हणती राही।*
*हे तुज बोलावे नलगे का ही।।*
*आता ग्रंथा चित्त देई।*
*झडकरी वेगा।।*
*ते सत्वाचे सात्विक।*
*की चैतन्याचे आंगिक।*
*हे बहु असो एकेक।*
*वानिसि काई।*
*तू संतस्तवनी रचसी।*
*तरी कथेची सेस करीसी।*
*परी निराळी बोल देखसि। सनागर।।*
*परि तो रसातिशयो मुकळी।*
*मग ग्रंथार्थदीपु उजळी।।*
*करी साधु हृदय राऊळी।*
*मंगळ उरवा।।*
*ऐसा गुरुचा उवायिला।*
*निवृत्तीदासासी पावला ।।*

*अ.५- ओवी १४०/१४३*

यासारख्या अनेक ओव्या सद्‌गुरु निवृत्तीनाथांच्या ज्ञानेश्वरीत आढळतात. प्राचीन मराठीवाङ्मयाचे अभ्यासक डॉ. म. रा. जोशी म्हणतात, 'ज्ञानेश्वरीत मूळ विषयाकडे लक्ष दे', 'विस्तार आवरता घे' यावरून त्या एखाद्या श्रोत्याने बुद्धिवादाला धरून किंवा गुरुत्वाच्या अधिकाराला धरून केलेल्या सूचना आहेत असे म्हणता येत नाही, तर विचक्षण अभ्यासू अशा अधिकाऱ्याचे ते मार्गदर्शन होय असे म्हणावे लागते.''

## तिन्ही भावंडे समाधिस्थ

श्रीसोपानदेव, मुक्ताबाई यांच्या अभंग रचनेवरून गुरू निवृत्तीनाथांनी त्यांना नाथपंथीय दीक्षेबरोबरच योगसाधना, पदपिंड-सामरस्यानुभाव, कुंडलिनीशक्ती - उत्थापना व विठ्ठलभक्ती दिली, हे सिद्ध होते. या सद्‌गुरुकृपेच्या सामर्थ्याने ज्ञानदेवांनी बोली अरूपाचे रूप दाविले. ज्ञानेश्वरीच्या रूपाने श्रीकृष्णोपासनेची मुहूर्तमेढ रोवली गेली. मग पंढरपुरात संत नामदेव, गोराकुंभार, सावतामाळी, चोखामेळा, बंकामहार, नरहरी सोनार, विसोबा खेचर, जगामित्र नागा अशी संतमंडळी एकत्र जमली. तीर्थयात्रा घडली. गुरुनिवृत्तीनाथांनी श्रीकृष्णपोसना व विठ्ठलभक्ती पसरविण्याचे, भागवत धर्माच्या स्थापनेचे, प्रसाराचे



Marathe Pratishthan

जे कार्य ज्ञानदेवांवर सोपविले होते, ते पूर्णत्वास गेले होते, इहलोकीचे कार्य संपल्यानंतर इथे रेंगाळण्यास कोणतेही कारण ज्ञानदेवांना दिसत नव्हते. तीर्थयात्रेहून परतताच त्यांनी संजीवन समाधी घेण्याचे निश्चित केले. आणि कार्तिक वद्य त्रयोदशीस आळंदीस, इंद्रायणीतीरी समाधी घेतली. याप्रसंगी, सदैव स्थिर असणारे निवृत्तीनाथ आतून गलबलून गेले होते. संत नामदेव वर्णन करताना म्हणतात -

*बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट।*
*ओघ बारा वाट मुरडताती।।*
*बांधल्या पेंढीचा सुटलासे आळा।*
*तृण रानोमाळा पांगलासे।*
*माय-बापे आम्हा त्यागियले जेव्हा।*
*ऐसे संकट तेव्हा झाले नाही*
*नामा म्हणे देवा पेटला हुताशन*
*करा समाधान निवृत्तीचे।।*

ज्ञानदेवांच्या समाधीमुळे त्यांची भावंडे उदास झाली. चांगदेवांनाही वाईट वाटले. सोपानदेवांनी देहत्यागाचा निर्णय घोषित केला. मार्गशीर्ष वद्य त्रयादेशीस सासवड येथे त्यांनी समाधी घेतली. पुणतांबे तिथे मुक्ताई शिष्य चांगदेवाने माघ वद्य त्रयोदशीला समाधी घेतली. ज्ञानदेव गेले, सोपान, चांगदेव ही गेले. 'तापसांचा मेळा फुटला' हे मुक्ताईच्या लक्षात आले तिची उदासिनता निवृत्तीनाथांनी ओळखली. संतमंडळ तापीतीरावर पोहोचले होते. तिथेच खानदेशात माणेगाव येथे वैशाख वद्य द्वादशीस, विजेच्या कडकडाटात आकाशात मुक्ताई अदृश्य झाली. 'होती ऐसी नाही झाली मुक्ताबाई.'

### देहाआधी गेला प्राण माझा

कार्तिक वद्य त्रयोदशी शके १२१८ ते वैशाख वद्य द्वादशी शके १२१९ अवघ्या सहा महिन्याच्या कालखंडात निवृत्तीनाथांची तिन्ही भावंडे समाधिस्थ झालेली. माणेगावी, तापीतीरावर निवृत्तीनाथ उदास, उन्मनी अवस्थेत बसले होते. संतमंडळीशीही बोलावेसे त्यांना वाटत नव्हते. निवृत्तीनाथांनी शून्यात लावलेली नजर पाहून निवृत्तीनाथांचे रंजन व्हावे म्हणून संतमंडळी गायन, वादन करीत होती पण निवृत्तीनाथांवर त्याचा काही परिणाम होत नव्हता. ज्ञानदेवांची आठवण काढून 'देहाआधीर गेला प्राण माझा' असे ते म्हणू लागले. भोवतीच्या संतमेळ्यास ते सांगू लागले

*ज्येष्ठाच्याही आधी कनिष्ठांचे जाणे।*
*केले नारायणे उफराटे*
*उफराटे फार कळले माझ्या मनी*
*वळचणीचे पाणी आढ्या आले*

अशा विलक्षण अवस्थेत निवृत्तीनाथांनी तापीतीराचा निरोप घेतला. संतमेळ्याला घेऊन ते त्र्यंबकेश्वरी आले. जिथे बोध प्राप्त झाला. गुरुभेट झाली तिथेच त्यांना कायमचे विसावयाचे होते. वाटेत त्यांनी सप्तशृंगी मातेचे दर्शन घेतले. ब्रह्मगिरी दिसू लागला. याच डोंगरातील एका गुहेत निवृत्तीनाथांना परमतत्वाची ओळख पटली होती. जिथून सुरुवात तिथेच शेवट आदि आणि अंत एकाच बिंदूपाशी. ज्येष्ठ वद्य द्वादशीस शके १२१९ ब्रह्मगिरीच्या पायथ्याशी श्रीनिवृत्तीनाथांनी समाधी घेतली. संत नामदेव म्हणतात -

लोपलासे भानु पडला अंधार।
गेला योगेश्वर निवृत्तीराज ।।

**- डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**
(पृ.१२०) ८/१३, सहकारनगर,
वडाळा, मुंबई ४०००३१
फोन नं. : ०२२-२४१५०८८९

## मानसन्मान

सौ. स्मिता वामन चक्रदेव यांची धाकटी कन्या साधना आता **डॉ. सौ. ऋचा राजेश शिदोरे (पृ.२६७)** ही गव्हर्नमेंट डेंटल कॉलेजमधून एम.डी.एस. (मास्टर्स इन डेंटल सर्जरी) ही पदवी प्राप्त करून गेली बारा वर्षे गोरेगाव (पू.) जयप्रकाश नगर येथे स्वत:ची प्रॅक्टिस करत आहे.

बरोबर २५ वर्षांपूर्वी जून १९८७ मध्ये तिने कायम अभिमान वाटेल अशी कामगिरी केली. ती मुंबई बोर्डात शालांत परीक्षेत ९३.५५% गुण मिळवून दुसरी आली, केवळ एक गुणाने तिचे पहिले स्थान हुकले.

पुढे गव्हर्नमेंट डेंटल कॉलेजलाही पहिल्या वर्षाच्या परीक्षेत तीनही विषयात डिस्टिंक्शन मिळवून संपूर्ण कॉलेजात पहिले येण्याचा मान पटकावला. पुढे दुसऱ्या व तिसऱ्या वर्षीही ती प्रथम क्रमांकानेच उत्तीर्ण झाली. डेंटलच्या चौथ्यावर्षाच्या परीक्षांच्या सरासरीतही तिचाच पहिला क्रमांक आला व त्यासाठी कॉलेजकडून विशेष मानपत्र व ट्रॉफी मिळाली व कॉलेजच्या बोर्डावर कायमचे नाव कोरले गेले.

तिला साजेसा साथीदार शोधू शकलो ह्यात आनंद आहे. तिचे पती बी.ई.(मेकॅनिकल) व एमएमएस असून आज महेंद्र लॉजिस्टिक्समध्ये जी.एम.च्या पदावर आहे. ते उत्तम गायक असून त्यांची गानसाधना चालू आहेच. शिवाय एक चांगले कवी व उत्तम फोटोग्राफर आहे. सतत नवीन शिकत राहण्याची आवड हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.

## मानसन्मान

**श्री. विलास भिकाजी मराठे (पृ.३६५)** यांना राष्ट्रपती सुवर्णपदक शौर्य पुरस्कार मिळाला. मा. राज्यपाल यांच्याहस्ते विशेष उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल प्रशस्तीपत्रक व प्रशस्तीपदक देऊन नुकताच त्यांचा सन्मान केला.

श्री. विलास भिकाजी मराठे हे कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यातील, कळंवुशी ग्रामीण गावातील महाविद्यालयात ७०० पैकी ६९९ गुण प्राप्त करणारे एकमेव विद्यार्थी होते. त्यावेळी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी त्यांचा सत्कार केला होता. त्यांचे थोरले भाऊ श्री. सुरेशराव मराठे यांनी ही माहिती पाठवली आहे.

श्री. विलास भिकाजी मराठे यांचे मराठे प्रतिष्ठानद्वारा हार्दिक अभिनंदन!

Marathe Pratishthan

# RAMAKANT - PERSONAL LIFE SKETCH 1

- श्री. रमाकांत माधव विद्वांस (पृ.६२३)

I was born in Pune city in a Normal middle class family. My mother Late Malatibai Vidwans was from Kurlekar clan and a matriculate for the good old era. She was from a family of medical Practitioners. Her father and two paternal uncles were practicing doctors. One of her brothers and a younger sister are surgeons owning their own hospitals. All of them have many doctors in the next generations. Even my younger sister Dr. Mrs. Vasudha Apte has followed suit and has become an eminent Medico-jurist.

My father – Late Madhav Shriniwas Vidwans was a practicing lawyer at Pune. His father Late Bapu Vasudeo Vidwans was a Hindu Law Prizeman of the then Bombay University and a close associate of Late Barrister Mukundrao Jaykar and a few other eminent Advocates. In the year 1912, he had traveled to England in connection with a legal matter which was before the Privy Council. Unfortunately, while returning from England, he got an attack of Appendicitis, his appendix burst and he died a few days after landing at Mumbai. My father's maternal grandparents were Late Justice Mahadev Govind Ranadeand his wife Late Smt. Ramabai Ranade.

At present, a very popular marathi serial 'Oonch Maza Zoka' is being aired on Zee Marathi Channel. The serial is on the Life of Late Smt. Ramabai and largely based on my father's book. My mother is from Kurlekar Family. Late Smt. Ramabai was her fathe's father's sister.

Most of the persons for our Vidwans Clan are either Engineers or directly or indirectly connected with the field of engineering. My father's great-grandfather – Late Mahadev Vyenkatesh Vidwans became an engineer in the year 1850. He was one of the first five persons selected by the British Administration to be trained as engineers and worked with the then Public Works Department. However, my father and his father were exceptions.

I had my basic education in the Nutan Marathi Vidyalaya and college education up to Intermediate Examination in Science in the Nowrosjee Wadia College at Pune. Thereafter, I did my Bachelor of Engineering from Walchand College of Engineering, Sangli and my Degree Master of Engineering from the University of Roorkee. Thereafter, while serving with the Hindustan Construction Co. Ltd., at Mumbai, I attended a three years part-time course at the Jamnalal Bajaj Institute of Management Studies and got my Post-graduate Diploma in Business Management. I also attended residential courses in Cost Estimating and Pricing and Programme Evaluation and Review Techniques at the National Institute for Training in Industrial Engineering, Powai

While I was in school, I appeared for the London Chamber of Commerce and passed my Book-keeping Examination with Distinction. Before taking up engineering, I joined Indian Merchant Marine Training Ship 'Dufferin' as an Officer Cadet. I stood 2nd in the all India Competitive Examination. I was a minor then and my father withdrew from the Training Course on account of some domestic problems, I being the only son. During my college days, I was an NCC Cadet and passed by 'B' Certificate Examination In NCC, I was rated as a good marksman and got a one inch group in firing practice.

In the year 1961, I married Miss Kusum Balkrishna Apte, daughter of an eminent Engineer and retired from Irrigation Department of Government of Maharashtra as Chief Engineer and Joint Secretary. Like her father, My wife – Shubha has been a first class student and a topper, all through her career and did her M.A. and B.Ed. and was a very popular teacher till her retirement in the year 1997.

In the Year 1960, I started my professional carrier with Tata Power Co. Ltd. at their Bhira New Tunnel Project at Dongarwadi near Pune. Though Dongarwadi was only about 60 kms. from Pune, it was a really godforsaken place and my 'Vanavas' started there.

After completion of tunnelling at Dongarwadi, in the year 1963, I started my long stint with The Hindustan Construction Co. Ltd. [HCC. My first posting was at Koyna Hydel Project near Chiplun. Our camp was in a jungle, about 20 kms. away from Chiplun, at the foot of Sanhyadry Mountain and my 'vanavas' continued.

Thereafter, I worked in Dandakaranya on the D. B. K. Railway Project which involved construction of twentythree tunnels, many minor and major bridges etc. Dandakaranya stretched on the borders of Andhra, tentacle of Orissa, Madhya



Marathe Pratishthan

Pradesh and Maharashtra. Our camp was at the foot of of Anantagiri Ghat in Andhra Pradesh. It was in an Aranya in every sense. We had fairly comfortable family accommodation in our camps. The camp has its own post office and a small bazaar. Nearest town was 20 kms. away and nearest Vishakhapattnam was 45 kms. away. My 'vanavas' thus continued.

In 1966, I was posted at the Head Office of The Hindustan Construction Co. Ltd. and I continued there till 1985. During this stint I got many opportunities to advance in my professional career. I could complete a couple of professional courses and also get my Post-graduate Diploma in Business Management. This helped to totally broaden my vision. My work involved planning of underground works, preparation of tenders for underground projects and attending to arbitrations. Most of the underground works used to be in jungles and mountainous terrain and I had to make frequent visits to these works. My 'vanavas' continued. All there projects were in Jungles and I had lot of opportunity to come in close contact with tigers, leopards, bears and wild bores etc.

In 1977, Indian Railways had invited tenders for Construction of the Calcutta Metro. Major length of the Metro was underground and passed through thickly populated area with many old buildings around. This was the first Metro in India and we had to get know-how from abroad. HCC decided to form Technical Collaboration with some foreign organization. My first travel abroad was to Europe This was the commencement of my 'Pardeshgaman'. I had a hectic 40 day tour of Europe visiting Metros in Italy, France, Germany, England, Norway, Sweden, Denmark, Greece, Switzerland, Czechoslovakia and Yugoslavia and studying their technologies. Finally we zeroed on the Hungary and entered into a Technical Collaboration with the Hungarians. I got the opportunity to prepare and sign the joint venture agreement and my Business Management background which also included Law of Contracts and other commercial laws, helped me a lot. HCC won the tender for Tunnelling with the help of shields.

This opened for me, a new field of formation of Joint Ventures. I also participated in preparation of tenders for overseas works but because of restrictive policies of the Government of India, Indians could not succeed except for works in Iraq. For these assignments I got many opportunities to travel to Europe, North Africa and Middle Eastern countries. I used to travel out of India almost about four to five times every year and by now I must have traveled abroad more than sixty to seventy timed.

All these projects were excellent learning grounds and gave me a very deep insight into the field of project engineering.

By 1985, I had with me extensive experience in tendering and planning for different type of projects and in particular those involving underground construction and formation of joint ventures with foreign companies. I left HCC after a stint of about 23 years and started my career as an Engineering and Management Consultant.

In my professional career I had quite a few achievements. I was instrumental in indigenous development of the Technology of Lake Piercing [Lake tapping] which was till then the forte of Europeans. Along the course of many rivers, there are huge deep bodies of stagnant water which get continually replenished during rainy season. In India such bodies are called 'Doh'. In lake tapping water from such natural lakes is tapped by constructing a tunnel to pierce the lake in standing water. The assignment involved Design, Layout, Planning, Evolution of Methodology of Construction and Supervision of Construction of the Submerged Water Intake Tunnel at Gadepan near Kota in Rajasthan for perennial water supply to Chambal Fertilizers & Chemicals Ltd. by tapping a Doh in River Kalisindh at a standing water depth of 16 m.

I was accepted by Malaysian Railways as Technical Consultant to Indian Railway Construction Corporation for Widening of Railway Tunnel in Residual Soils near Seremban using the New Austrian Tunnelling Technology.

I was accepted by the Government of Mauritius – as Associate Technical Consultant of Consulting Engineering Services [India] P. Ltd. for Preparation of Detailed Project Repoprt on the Quoin Bluff Mountains and the Moka Saddle in northern Mauritius

I was accepted by Ethiopian Road Development Authority as Associate Technical Consultant of Lea International Ltd. for Rehabilitation of an old Road Tunnel near Tarmaber. This was in close competition with the Europeans.

I was accepted by the Asian Development Bank - [ADB] as Associate Technical Consultant of Kirloskar Consultants for Preparation of Detailed Project Report on Tunnels in Katraj and Khambatki Mountains between Pune & Satara, for Four Laning of National Highway No. 4

Mumbai Metro Planning Group – a group comprising of Indian and Foreign Organizations headed by Tata Consultancy Services had undertaken a study to update Technical Feasibility of Totally Underground Construction. I had participated in selection of vertical & horizontal alignment, evolving most Economic Methodology of Construction and Forming



Marathe Pratishthan

Realistic Time & Cost Estimates

I have planned, designed and supervised construction of the Twin Tunnels on the Pune Westerly By-pass of NH 4 which is now the new Katraj Ghat. I have planned and designed underground facilities for a secret project for Defence.

I have been a Member of Team appointed by Bureau of Indian Standards for formation / revision of Tunnel Safety Code and Safety Code for Working in Compressed Air etc.

I was Co-convener of Indian Road Congress Committee H – 7 and main author for Specification No. IRC:SP:91-2010 - Guidelines for Road Tunnels which covers the aspects of Planning, Design, Construction, Operation and Maintenance. The guidelines are applicable to all Road Tunnels that are being planned.

At present, I am a Technical Consultant to IL & FS Transportation Network Ltd. who is Concessionaire for the two parallel tunnels each about 9 km. long under the Patni Top Mountain in Himalayan Kashmir. The tunnel will reduce the distance between Udhampur and Ramban by about 30 kms. and save a climb of about 800 m. and convert the road into an all weather road. The contract is worth about 3,500 crores.

By the grace of God, I have had a highly accomplished technical career and even today at the age of 76 years, I am still active and energetic and with a large clientele. In the past I have had many interesting experiences. I propose to share my experiences through a few articles in Hitguj.

- रमाकांत विद्वांस, (पृ.६२३)
३१,गुडविल ॲश्युरन्स सोसायटी, बीपीएल मोबाईल सेंटरच्यामागे, मनमाला टँक रोड, माटुंगा (प.), दूरध्वनी : ०२२-२४३०५२६०

## अभिनंदन व अभिष्ट चिंतन

आपले कुलबांधव श्री. वामन नारायण चक्रदेव व सौ. स्मिता वामन चक्रदेव (पृ.२६७) यांच्या विवाहाला दिनांक २२-१-२०११ला ५०वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने त्यांनी 'हितगुज'ला २०००रु. ची देणगी दिली आहे.

श्री. वामन नारायण चक्रदेव व सौ. स्मिता वामन चक्रदेव या पती-पत्नीचे मराठे प्रतिष्ठानद्वारा हार्दिक अभिनंदन आणि अभिष्टचिंतन. उभयतांना सुखसोबत, आरोग्यसंपन्न लाभो ही शुभेच्छा. देणगी देऊन सहकार्य केल्याबद्दल विशेष आभार. मराठे प्रतिष्ठानवर असाच लोभ असावा ही विनंती. जीवेत शरदः शतम।

- **सौ. स्मिता वामन चक्रदेव,** फोन - ०२२-२६२८४०५० मोबाईल : ९८१९१३२३०४

## अभिनंदन व अभिष्ट चिंतन

मराठ्यांची माहेरवाशीण सौ. साधना (श्री. वामन व सौ. स्मिता चक्रदेव (पृ.२६७) यांची धाकटी कन्या) हिचे मामंजी **श्री. श्रीकृष्ण शिदोरे** यांनी दिनांक १३-१-२०१२ला ८१ वर्षे पूर्ण केली. त्यांच्या 'सहस्त्रचंद्रदर्शना' निमित्त त्यांनी 'हितगुज'ला २०००रु देणगी दिली.

श्री. श्रीकृष्ण शिदोरे यांना आरोग्यसंपन्न, दीर्घायुष्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना. त्यांनी हाती घेतलेल्या महत्त्वपूर्ण कामाच्या योजना साकार व्हाव्यात या शुभेच्छा! जीवेत् शरदः शतम। ही प्रार्थना.

देणगी दिल्याबद्दल मराठे प्रतिष्ठानद्वारे धन्यवाद आणि आभार. असाच लोभ असावा ही विनंती.

(श्री. श्रीकृष्ण शिदोरे यांच्याविषयी माहिती याच अंकात दिली आहे.)

## नांदा सौख्यभरे

सौ. सुजाता व श्री. चंद्रकांत वामन मराठे (पृ.१००), ठाणे यांची कनिष्ठ कन्या चि. सौ. कां. केतकी हिचा विवाह चि. जयेश माधव जोशी याजबरोबर संपन्न झाला त्याप्रीत्यर्थ शनिवार दिनांक २८ एप्रिल २०१२ ला संध्याकाळी शहनाई हॉल, ठाणे येथे स्वागत समारंभ थाटामाटात साजरा झाला.

चि. सौ. कां. केतकी आणि चि. जयेश या वधुवरांना मराठे प्रतिष्ठानद्वारा हार्दिक शुभेच्छा!

## व्रतबंध

सौ. नीलिमा विद्वांस यांचा नातू **चि. प्रणित** (सौ. नीता योगेश सोमठाणकर यांचा मुलगा याचा मौजीबंधन सोहळा दिनांक ३ फेब्रुवारी २०१२ रोजी बदलापूर येथे मोठ्या थाटामाटात संपन्न झाला.

बटू चि. प्रणितला मराठे प्रतिष्ठानद्वारा अनेकोत्तम शुभाशिर्वाद.



Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करून यावे म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

शुक्रवार दिनांक ३० मार्चला दुपारी चार वाजता मराठे प्रतिष्ठानची बैठक प्रभादेवी येथील मराठे उद्योग भवनात भरली.

बैठकीला अध्यक्ष, श्री. आनंदराव मराठे, कार्यवाह श्री. मोहन मराठे, श्री. हेमंत मराठे, श्री. सी. गो. खांबेटे, श्री. सुरेश मराठे, श्री. प्रमोद मराठे, श्री. प्रभाकर व डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे इ. सदस्य उपस्थित होते.

सभेत मागील इतिवृत्ताचे वाचन झाले. पत्र-व्यवहारावर चर्चा झाली. 'हितगुज'चा प्रकाशन-खर्च, छपाईखर्च मंजूर करण्यात आला. वास्तू-प्रकल्पासाठी चर्चा झाली. संपादिकेने श्री. प्र. सि. मराठे यांनी 'सुबोध अनुष्टुप ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ लिहिला असून केशव भिकाजी ढवळे प्रकाशनाने तो छापला आहे. त्याची मूळ किंमत ८००रु. आहे, पण मराठे कुलबंधूंसाठी तो सवलतीत ५५०रुपयांना उपलब्ध करून दिला जाईल. श्री. प्र. सि. मराठे यांनी या ग्रंथाची एक प्रत मराठे प्रतिष्ठानसाठी सादर भेट म्हणून संपादिकेकडे पाठविली असल्याचे सांगितले.

पुढील बैठक आनंदरावांच्या घरी घेण्याचे ठरवून चहापानाने सभेची सांगता झाली.

---

शुक्रवार दिनांक २५ मे २०१२ ला मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीची बैठक अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे, ठाणे यांच्या निवासस्थानी भरली.

बैठकीला सर्वश्री रमाकांत विद्वांस, वि. के. मराठे, वा. ग. मराठे, सी. गो. खांबेटे, गजानन मराठे, अरुण मराठे, रमेश मराठे, प्रमोद मराठे, लक्ष्मणराव मराठे, हेमंत मराठे, कर्नल प्रमोदन मराठे, सौ. नीलांबरीताई, डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे इ. कार्यकारिणीतील सदस्य उपस्थित होते.

कार्यवाह श्री. हेमंत मराठे यांनी मागील सभेचे प्रतिवृत्त संमत केले. त्यानंतर पत्रव्यवहाराचे वाचन केले. श्री. ना. ज. जाईल यांनी पाठविलेले पत्र वाचले. 'हितगुज' साठी कायमस्वरूपी निधी जमा करावा. त्यासाठी किमान ५० सदस्यांनी 'मराठे प्रतिष्ठान'कडे रु.१०,०००/- तीन वर्षांसाठी बिनव्याजी ठेव ठेवावी. यावर अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे, उपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस यांनी १०,००० रु. ठेव म्हणून देण्याचे मान्य केले आहे. जाईलांच्या योग्य सूचनेचा सर्व कुलबांधवांनी विचार करून त्यावर कृती करण्याचे आवाहन संपादिकेने केले.

श्रीमती लीलाताई मराठे यांनी पाठवलेल्या पत्राचे वाचन झाले. त्या पत्राला अध्यक्षांनी पाठवलेल्या समर्पक, सविस्तर उत्तराचे वाचन झाले. त्यावर साधक-बाधक चर्चा होऊन काही तांत्रिक अडचणींमुळे तो वास्तूप्रकल्प तहकूब करावा असा निर्णय सर्वांनुमते कार्यकारिणीत घेण्यात आला.

वास्तू प्रकल्प योजना बारगळली नसून प्रतिष्ठानने आणि सर्व कुलबंधूंनी नवीन जागा शोधण्यासाठी प्रयत्न चालू ठेवावे अशी अध्यक्षांनी सूचना केली. त्याला सर्वांनी अनुमोदन दिले. वास्तूप्रकल्पासाठी पैसे लागणार म्हणून गुणवत्ता पारितोषिके देण्याचे थोडे दिवस थांबवले होते, पण या वर्षी गुणवत्ता पारितोषिके परिवारातील यशस्वी विद्यार्थ्यांना देण्याचे ठरले.

या मीटिंगला सी.ए. मंदार भावे यांनी मार्गदर्शन केले. त्यांना ८०जीच्या संदर्भात श्री. गजानन मराठे, पुणे हे मदत करणार असल्याचे ठरले.

श्री. आनंदराव व सौ. नंदिनी वहिनींना यांनी आग्रह करून वाढलेल्या सुग्रास भोजनाचा सर्वांनी आस्वाद घेतला. त्यानंतर तापलेल्या उन्हाळा सुसह्य व्हावा म्हणून आईस्क्रिमचाही स्वाद घेतला. त्यानंतर अध्यक्षांचे आभार मानून सभा संपली.

## सहवेदना

मंगळवार दिनांक २९ मे २०१२ला सकाळी अकरा वाजता आपल्या कुलभगिनी **श्रीमती लीलाताई अनंत मराठे (पृ.३९२)** यांची प्रदीर्घ आजाराने प्राणज्योत मालविली. त्यांचे पती कै. श्री. अनंतराव मराठे प्रतिष्ठानचे कार्यकारिणी सदस्य होते. त्यांचे चिरंजीव श्रीनिवास हे मराठे कुलवृत्तांताचे काम करीत आहेत. मराठे प्रतिष्ठानच्या बैठकांना ते उपस्थित असतात. सुप्रसिद्ध वृत्तनिवेदिका सौ. मंजिरी श्रीनिवास मराठे या कै. श्रीमती लीलाताईंच्या सूनबाई आहेत.

गोवा-बिंबल येथे मराठे प्रतिष्ठानचे आठवे अखिल भारतीय परिवार संमेलन २००५ ला भरले होते. श्रीमती लीला अनंत आणि श्री. अनंत रामचंद्र हे दोघे पती-पत्नी संमेलनात आनंदाने सहभागी झाले होते.

श्रीमती लीलाताईंच्या स्मृतींना मराठे प्रतिष्ठानद्वारा विनम्र श्रद्धांजली

## मानसन्मान

**M. L. Varadpande** (पृ. ६२३) (b 1936 , Arvi, Distt. Wardha) M. A. Nagpur University, Married Shobha Vidwans (B. A., Diploma in Printing Technology Oxford, England ) in 1965. Career as farmer orange grower,Academician, Journalist and Bureaucrat at Nagpur, New Delhi.Now settled at, Gurgaon, Haryana.

Author of 25 books (English) on Indian art, literature and culture, particularly theatre history and art. Three books in marathi. Sangeet Natak Akademy, National Academy of dance, music, drama conferred on him Tagore Akademy Puraskar, a National honor for contribution to the field of performing arts as a scholar in december 2011. Award: A citation, mahavastra and rupees one lakh.



Marathe Pratishthan

# महाभारतातील मला आवडलेला प्रसंग : ७

**श्री. प्रभाकर त्रिंबक विद्वांस (पृ.६४६), अहमदाबाद**

महर्षी व्यासरचित महाभारत ही खरोखर भारतीय साहित्य संस्कृतीला लाभलेले अमूल्य लेणे आहे. निरनिराळ्या व्यक्तिमत्त्वाच्या, विविध मनोवृत्तींच्या असंख्य पात्रांना एका सूत्राने बांधून ठेवणारी ही कदाचित जगातली पहिली आणि शेवटची कलाकृती आहे. महाभारतात अनेक विसंगत, घृणास्पद, रोमहर्षक, करुण, प्रक्षुब्ध करणारे, उदात्त प्रसंग आढळतात. त्यातील 'यक्ष प्रश्नांचा' प्रसंग प्रत्येकाला स्पर्शून जाण्यासारखा आहे.

यक्ष-युधिष्ठिर प्रश्नोत्तरी महाभारतातील एक मास्टरपीस प्रकरण आहे.

यक्ष-युधिष्ठिर कथा बहुतांशी सर्वांना माहीत असेल. कथेच्या उत्तरार्धाच्या भागाचेच येथे रसग्रहण करावयाचे आहे आणि त्यामधील विशाल, उदात्त भावनेचे दर्शन करवायचे आहे.

भीम, अर्जुन, सहदेव आणि नकुलचा शोध घेत घेत युधिष्ठिर तळ्याजवळ आला. तळ्याच्या काठाशी चारहीजण अर्ध मृतावस्थेत आढळले. त्यांच्या तोंडावर पाणी शिंपडून त्यांना शुद्धीवर आणण्यासाठी युधिष्ठिर पाणी घेण्यासाठी तळ्याजवळ गेला. तोच तळ्यातून यक्ष प्रकट झाला. यक्ष म्हणाला, ''या तळ्याचा मी मालक आहे. माझ्या परवानगीशिवाय या पाण्याला कुणालाच स्पर्श करता येणार नाही. जो माझ्या प्रश्नांची अचूक उत्तरे देईल त्यालाच मी पाणी घेण्याची अनुमती देतो. माझ्या आज्ञेच्या उल्लंघन केल्यामुळेच तुझ्या या चार भावांची अशी अवस्था झाली.''

सौम्य, सज्जन, विचारशील युधिष्ठिराने विनम्रपणे यक्षाला नमन केले आणि म्हणाला, ''यक्षराज! जी वस्तू माझ्या मालकीची नाही त्यासाठी आडदांडपणा किंवा बलप्रयोग करून मला ती घेण्याची इच्छा नाही. तुमच्या प्रश्नांची उत्तरे देऊन मला पाण्याला स्पर्श करण्याची आज्ञा मिळणार असेल तर माझ्या या प्रिय बांधवांच्या प्राण रक्षणासाठी मी तुमच्या प्रश्नांची उत्तरे देण्यास तयार आहे.'' मी अतिसामान्य असल्याने तुमच्या प्रश्नांची यथाबुद्धि, उत्तरे देण्याचा प्रयत्न करीन.''

त्यानंतर यक्ष आणि युधिष्ठिरामध्ये दीर्घ प्रश्नोत्तरी झाली. यक्षाच्या सर्व प्रश्नांची अचूक उत्तरे युधिष्ठिरने दिली. यक्ष प्रसन्न झाला आणि म्हणाला, ''तुझ्या या चार भावांपैकी फक्त एकाला मी जीवनदान देतो. तू सांगशील त्या भावाला जिवंत करतो.''

या सर्व कथेची अतिउच्च स्थिती आता निर्माण झाली. युधिष्ठिर कुणाचे नाव सांगतो ही उत्कंठा निर्माण होते. एका क्षणाचाही विलंब केल्याशिवाय युधिष्ठिराने नकुलाचे नाव सांगितले.

आश्चर्यचकित यक्षाने विचारले, ''हे भीम-अर्जुनासारख्या शूरवीर, बलाढ्य, पराक्रमी बांधवांना सोडून नकुलाची पसंती करण्याचे कारण?''

यावर युधिष्ठिराने जे स्पष्टीकरण दिले ते खरोखर अद्‌भुत, अद्वितीय, उदात्त आणि नैतिक जबाबदारीची पूर्ण जाणीव असलेले होते. म्हणूनच हे प्रसंग-प्रकरण मला फार आवडते.

युधिष्ठिर म्हणाला, ''न्याय आणि सर्वत्र समभावनेसाठी माझा नावलौकिक आहे. कुंती आणि माद्री या माझ्या दोन माता. दोघींच्याठायी माझ्या मनात समान पूज्यभाव आहे. पांडूराजा बरोबर सती जाताना माद्रीने तिच्या जनक पुत्र-नकुलला माझ्या जन्मदात्री मातेच्या - कुंतीच्या पदरात घातले होते. ज्येष्ठ पांडव या नात्याने नकुलाची नैतिक जबाबदारी माझी आहे. सर्व भावंडांमध्ये नकुल लहान (शेंडेफळ) असल्याने कुंतीचा तो लाडका आहे म्हणून हे यक्षराज! तुम्ही नकुलास जीवनदान द्या.''

असे उत्तर देणाऱ्या विभूतींची कोणालाही आरती करण्याची इच्छा होईल. यक्ष खुश होऊन त्याने भीम, अर्जुन, सहदेव आणि नकुल यांना जीवनदान दिले.

**- प्रभाकर त्रिंबक विद्वांस** (पृ.६४६)
२, आरोही रेसीडेन्सी, सरदार पटेल रिंग रोडजवळ,
बोपल, अहमदाबाद ५८
मोबाईल नं. ९४२९१३२२८६

**गेली ३० वर्षे सातत्याने**
**संगीताचे शिक्षण देणारी संस्था**

**सरगम संगीत विद्यालय**

रघुनंदन, ४५, मयूर कॉलनी, कोथरूड, पुणे ४११०३८
दूरध्वनी : २५४३९७६४ मोबाईल : ९८२२७५४६४०

शास्त्रीय गायन, सुगम संगीत,
तबला, हार्मोनियम, सिंथेसायझर
यांचे शास्त्रीय शिक्षण देणारी नावाजलेली संस्था

Marathe Pratishthan

## वाचकांचा पत्रव्यवहार

मार्च २०१२ चा हितगुज अंक आज १४मार्च रोजी हाती पडला. मराठे कुटुंबीय किती पराक्रमी, हुशार आहेत हे विविध लेखांमुळे कळले. आपणही व्यवस्थापनेबद्दल काटेकोर काम करीत आहात ह्याबद्दल कौतुक करावेसे वाटते. वास्तुसाठी (संस्थेच्या) देणगी (जागेची) देणाऱ्या मराठ्यांचेही आभार. घरची काम हल्ली कोणी करत नाही तर समाजात काय करणार तरीही आपण आपला संसार सांभाळून ही कामे करता म्हणून आपला गौरव-कौतुक करावेसे वाटते.

कालच माझ्या मित्राचे ओठांचे मोठे ऑपरेशन झाले त्याबद्दल त्याची तब्येत पाहावयास गेलो होतो तेव्हा तो म्हणाला की तू मला तंबाखू सोडायला सांगितली होती पण तुझे ऐकले नाही म्हणून ही अवस्था झाली व मला १०-२-१९९२ ही तारीख आठवली. कारण ह्या दिवशी एक वर्ष पूर्ण झाले होते व मी माझ्या ४०-५० सर्व वयोगटातल्या मित्रांना मिमिक्रीचा कार्यक्रम ठेवला आहे व त्यानंतर डीनर आहे असे सांगून आमंत्रित केले होते. सर्व कार्यक्रम झाल्यावर मी जाहीर केले की आज १०-२-१९९२ ला मी तंबाखू खायची सोडून एक वर्ष पूर्ण झाले व त्याची आठवण म्हणून व तुम्हांपैकी जे कोणी खात असतील त्यांनी पण सोडावी ह्या हेतूने आजच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते तेव्हा सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. काही माझे मित्र उद्यापासून तंबाखू सोडतो म्हणाले पण ज्या मित्राचे ओठाचे ऑपरेशन झाले होते त्याने सोडली नाही उलट माझी मस्करीच केली होती ती त्यालाच जाणवली व तो मला म्हणाला तुझे ऐकले असते तर आज माझ्यावर ही वेळ आली नसती. जे व्हायचे ते होणारच आहे पण आपल्या हाताने दुखणे ओढवून घेणे योग्य नाही तसेच आधी केले मग सांगितले ह्या संतांच्या वागण्यात, बोलण्यात कितीतरी गर्भीतार्थ असतो हेच सुचवायचे आहे. आपल्या सर्व पुढील कार्यास शुभेच्छा. आपले लिखाण वाचनीय असते त्यामुळे आवडते.

डिसेंबरात मुंबईस १७ ते २२ होतो तेव्हा दादर येथे स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात साथ-साथ ह्या संस्थेच्या सातव्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे कार्यक्रम पाहण्याचा योग आला. त्यात विविध क्षेत्रातील नामवंतांचे एकाच विषयावर फक्त अकरा मिनिटात विचार मांडण्याचा कार्यक्रम होता. त्यात हितगुज अंकात मागच्या पानावर (निर्माण ग्रुप) जाहिरात (नियमित) देणारे मराठे होते. व त्यांचे वक्तव्य उपस्थितांना भावले. उपस्थित सदस्यांनी पहिल्या क्रमांकाची मते त्यांना देऊन साथ-साथ संस्थेने ट्रॉफी भेट दिली. त्या मराठ्यांचे कौतुक कारण सध्याच्या काळात कशाची जरूर आहे ह्या विषयावर सात वक्त्यांनी (धार्मिक, राजकारण, कलावंत, समाजसेवक, उद्योजक, चिकित्सक, शिक्षक) अकरा मिनिटात (प्रत्येकाला) आपले मत व्यक्त करायचे होते. त्यात अक्षरश: डॉ. अजित श्रीराम मराठे यांना प्रेक्षागृहाने डोक्यावर घेतले. त्यांचे आभार आणि अभिनंदन

**- मोहन मराठे (पृ. ४२१)**
विक्रम एजन्सी, 'समर्थ', शियापुरा, रावपुरा, बडोदरा ३९०००१
दूरध्वनी : -०२६५-२४३०३०

---

'हितगुज'चा मार्च२०१२ चा अंक अतिशय चांगला निघाला आहे. त्याबद्दल आपले अभिनंदन.

१. 'मराठीचं भूत' हा लेख आवडला. मी स्वत: शुद्ध मराठीत बोलतो - इतका की 'फ्रीज' ला 'शीतकपाट' असेच म्हणतो. एकदा माझ्या मुलीचा मित्र आमच्याकडे सपत्नीक आला होता. त्याच्या पत्नीने विचारले, ''बाबा मायक्रोवेव्हला काय म्हणतात?'' त्यावर नवऱ्यानेच तिला उत्तर दिले ''उष्ण कपाट!'' भय्यांशी मी मराठीतूनच बोलतो. भय्ये सामान्यत: उर्मटच असतात. त्यांना मी सांगतो,''मराठीमे बोलता तुम्हारे लिये बिलकुल आसान है। इससे भाईचारा बढ जाता है. याने ते खूश होतात व प्रयत्नही करतात.

२. मी सध्या जपानला माझी इंडोजापनीज नात 'अंजू' हिला बघण्यासाठी जात आहे. तिकडून आल्यावर यथावकाश व यथाशक्ती 'हितगुज'फंडासाठी नक्कीच मदत करीन. शक्यतेनुसार एकरकमी किंवा हप्त्याने.

३. 'मराठीतील असभ्य म्हणी, वाक्प्रचार व संकेत' हे माझे पुस्तक ग्रंथालीकडून तीन महिन्यांपूर्वी प्रकाशित झाले आणि तेवढ्याच काळात पूर्णपणे संपले. त्याची दुसरी आवृत्ती काही दिवसात निघेल. पूर्वी मी आपणाकडे त्यातील काही (सभ्य) भाग-बहुधा मेव्हणी संबंधी- प्रसिद्धीसाठी पाठवला होता. तो पुढच्या अंकात शक्य झाल्यास द्यावा. गेल्या आठवड्यात वाचकांचे फोन दिवसभर येत होते. काहींनी त्यात भरही पाठवली. यातून काही आर्थिक लाभ चांगला झालं तर देणगीही चांगली देता येईल.

४. बाप -घराचे अस्तित्व हा लेख अत्यंत भावला. साने गुरुजी यांच्या 'श्यामची आई' या पुस्तकाने आईचे नको तितके स्तोम माजवले आहे असे माझे (वैयक्तिक) मत आहे. त्याला हातभार लावणारे आचार्य अत्रे! त्यांनी त्या पुस्तकाला 'मातृत्वाचे महन्मगल स्तोत्र' म्हटले आणि त्यावर चित्रपटही काढला (आणि पैसा कमावला) आई ही एक सर्व मानवी विकारांनी ग्रस्त अशी व्यक्ती आहे. दारिद्र्यग्रस्त आईने आपल्या मुलांना घरातून झोडून काढून हाकलताना मी बघितले आहे.

या अंकात अशुद्ध लेखन, मजकूर गाळणे असे दोष फार आहेत. प्रूफे तपासण्याकडे अधिक लक्ष पुरवावे अशी आग्रहाची विनंती.

**- अ. द. मराठे (पृ.२७०),** ६ मंजूषा, विकास हाऊसिंग सोसायटी, शास्त्रीनगर, डोंबिवली (प.) ४२१ २०२



Marathe Pratishthan

## वाचकांचा पत्रव्यवहार

सध्या रिकामटेकडा व मोकळा वेळ बराच मिळतो तो सार्थकी लावण्याचा माझा प्रयत्न चालू आहे. त्यात हितगुजमधील तुमचा हनुमंतावरील लेख वाचला. तो आवडला म्हणून हे पत्र.

ज्ञान आणि मनोरंजनाबरोबर हनुमंताच्या गुणवत्तेचे महत्त्व आता मनात खोल जाऊन रूजले आहे. हा लेख प्रत्येकाने वाचला पाहिजे इतके त्याचे पारायण करायला हवे.

हनुमंताच्या कामगिरीवर प्रभू रामचंद्रांचे उद्‌गार 'तुझ्या प्रत्येक उपकाराच्या फेडीसाठी मी प्राणदान देण्यास योग्य आहे.' हे शब्द रामायण वाचणाऱ्यांनी आपल्या मनावर कोरून ठेवायला हवेत.

खरं तर सध्याचे वातावरण व परिस्थिती इतकी बिघडली आहे की ज्या दिवशी रामराज्य सुरू होईल तो दिवस भाग्याचा ठरेल.

**- रंगा मराठे (पृ.३८४)**

९-१० ब श्रवण अपार्टमेंट, नवश्या मारुती गल्ली, सिंहगड रोड, पुणे ४११०३० फोन : ०२०-२४२५२७४१

---

मार्च २०१२चा 'हितगुज' मिळाला. खूपच समाधान वाटले. अंकाविषयी एक विशेष गोष्ट ती म्हणजे वैयक्तिक आपले अंकाविषयीचे नाते. अंक वेळेवर मिळावा, वाचकांनी वाचावा. प्रतिक्रिया कळवाव्यात व त्यामध्ये काही सुधारणा, सूचना द्याव्यात या तुमच्या नाते म्हणून अपेक्षा फारच मोलाच्या व सर्व मराठे बांधवांना 'हितगुज'चे नात्याने व माध्यमाने प्रेम, भावना यात बांधण्याचा प्रयत्न खूपच वाखणण्यासारखेच आहे. स्तुती नव्हे तर प्रॅक्टिकल आहे. हा माझा अंकाविषयीचा व आपल्या आपुलकीचा मोठा वाटा आहे. जे वाटलं ते लिहिलं. असो.

अंक टापटीप, छान, सुरेख.

१. मानसन्मान, अद्वैत मराठेचे मी फोनवर कौतुक केलेच आहे. खूप विशेष गोष्ट आहे, मनास खूप भावली. प्रयत्नवादाचे खरे उदाहरण

२. बहुविध व्यक्तिमत्व कै. सदानंद कृ. मराठेविषयी लेखातून खूपच घेण्यासारखे गुण आहेत. सोवनींचे अभिनंदन.

३. नंदू व सिगारेट मोठी गमतीशीर व विनोदी व भूतकाळातील आठवण. लेख छान वाटला.

४. घराचे अस्तित्व हा लेख आमचेकडे आहे तरीसुद्धा त्याचे स्मरण करणे अत्यंत गरजेचे आहे.

मन:पूर्वक शुभेच्छा

**- भा. द. मराठे,** मोरया, प्लॉट ३७, सह्याद्री नगर, मिरज, जि. सांगली. ४१६४१०

## श्री. श्रीकृष्ण शिदोरे यांची माहिती

माझी सर्वात धाकटी कन्या साधना हिचे सासरे श्रीकृष्ण शिदोरे यांचे जीवनकार्य तर वाखाणण्यासारखे आहे. शिरवळ सारख्या खेड्यात बालपण गेल्यावर त्यांनी आईवडिलांपासून दूर राहून पदवीपर्यंत शिक्षण पूर्ण केले. शालेय जीवनात वाईला संघ कार्यात स्वत:ला वाहून घेतले. मॅट्रीकच्या वर्षात संघ सत्याग्रहात भाग घेऊन सहा महिन्याचा कारावास होऊनही पंधरा दिवसात अभ्यास करून मॅट्रीकची परीक्षा चांगल्या मार्कांने पार पडली.

मुंबईत नोकरीला आल्यावर संघ संस्कारातून निर्माण झालेल्या सामाजिक कार्याच्या आवडीतून गोरेगाव प्रवासी संघ ही प्रवाशांची संघटना उभारली. त्यांच्या या प्रयत्नातून गोरेगाव-चर्चगेट लोकल सुरू झाल्या. अनेक वर्षे ते रेल्वेच्या प्रवासी सल्लागार समितीवर होते. मुंबईच्या स्तरावर बॉम्बे कॉम्प्युटर्स कौन्सिल ही संघटना बांधून त्यांनी दादर-बोरीवली, दादर-विरार तसेच दादर-कल्याण आणि दादर-ठाणे अशा इंटरसबर्ब गाड्या चालू करून घेतल्या. लोकल रेल्वे आणि बस प्रवाशांचे अनेक प्रश्न सोडवले.

व्यवसायाने पत्रकार असल्याने रेल्वे आणि अन्य सामाजिक प्रश्नावर विपुल लेखन करून जनजागृती केली. गोरेगावच्या महाराष्ट्र मंडळाचेही ते अध्यक्ष होते. निवृत्तीनंतरही त्यांनी शिदोरे कुलवृत्तांताच्या कार्याला वाहून घेतले आहे व या उतार वयातही ते या पुस्तकाच्या संकलन आणि संपादकीय कामात व्यस्त आहेत.

**प्रेषक : सौ. स्मिता वामन चक्रदेव (पृ.२६७)**

अंधेरी, 'रघुकुल', ३१/सी.पी.एनबीई को.हौ.सो. लि., लल्लुभाई पार्क, अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५८ दूरध्वनी : ०२२-२६२८४०५० मोबाईल : ९८१९१३२३०४

### मानसन्मान

'चला बदल घडवू या' गिरीश जाखोटिया लिखित पुस्तकाला 'पद्मगंध प्रतिष्ठान पुरस्कार' नागपूर मिळाला आहे. डॉ. गिरीश जखोटिया यांचे अभिनंदन. (सौ. मंजिरी (पृ.१२८) मराठ्यांची माहेरवाशीण आहे. डॉ. गिरीश जाखोटिया जावई)



Marathe Pratishthan

घराच्या समोरच विद्यालय. त्यामुळे विद्यालयाच्या प्रांगणातच प्रमोदजी लहानाचे मोठे झाले. लहान असताना सर्वप्रथम वडिलांकडे गाण्याचे शिक्षण सुरू झाले. त्यामध्ये स्वरज्ञान मिळाले आणि ८-९वीत असतानाच विद्यालयात थोडा काळ राहायला आलेले कल्याणचे श्री. दिलीप गोसावी यांच्याशी मैत्री होऊन हार्मोनियमचे पलटे वाजवणे सुरू झाले आणि हार्मोनियमशी मैत्री केव्हा झाली हे कळलेच नाही. अर्थात आमच्या घरातील सर्वांत हुशार मुलगा.

हार्मोनियमशी मैत्री झाली खरी पण शाळेतील ९वी-१०वी ही महत्त्वाची वर्षे होती. आमचे वडील शांत होते. पण घरातील बाकी सर्वांनी आपापल्या परीने समजावून, रागावून झाले. पण ही मैत्री अतूट होती. मग आठ-आठ तास रियाज सुरू झाला. पुढे गुरु पं. मनोहरपंत चिमोटे यांचेकडे शिक्षण सुरू झाले. संवादिनी हे नाव ज्यांनी हार्मोनियमला दिले तेच गुरू प्रमोदजींना भेटले आणि प्रमोदजींचा संवादिनीशी संवादच सुरू झाला. त्यानंतर त्यांनी कधी मागे वळून पाहिले नाही. स्वत:च्या प्रगतीबरोबरच गांधर्वच्या कामातही स्वत:ला तनमन धनाने झोकून दिल्यामुळेच विद्यालयानेसुद्धा चांगले दिवस पाहिले. नवनवीन उपक्रम सुरू झाले. त्यासाठी लागणारे पैसे संस्थेकडे कसे जमा करायचे हे काम फक्त प्रमोद मराठेच करू शकतात याचा अनुभव सर्वांनी घेतला आणि मग नियामक मंडळाच्या मीटिंगमध्येही सर्व मनासारखी दाने पडू लागली. मुख्य म्हणजे मंडळाचे अध्यक्ष श्रीमंत दाजीकाका गाडगीळ यांचा फार मोठा पाठिंबा मिळत गेला.

विद्यालयाच्या आर्थिक आघाडीबाबत काम करताना विद्यादानाचे कामही मनापासून करणाऱ्या प्रमोदजींच्या हाताखाली अनेक शिष्य तयार झाले. स्वत:च्या आनंदी स्वभावामुळे माणसे जोडणे तसेच उत्तम शिकवण्याची हातोटी त्यामुळे विद्यार्थीप्रिय गुरू, अनेक कलाकारांबरोबर साथ करण्याची संधी मिळाल्यामुळे सर्वच वैचारिक बाबतीत आलेली श्रीमंती याचा फायदा विद्यालयाला झाला. घरातूनही योग्य साथ मिळत गेली. सौ. परिणिताचे योगदानही तेवढेच महत्त्वाचे ठरते.

कृतज्ञता म्हणजे आपल्याला जे काही मिळालं त्याची जाणीव असणं. कृतज्ञता व्यक्त करणं म्हणजे ज्यांच्यामुळे आपल्या आयुष्यात सकारात्मक बदल घडला त्याबद्दल आभार व्यक्त करणं. ही जाणीव असणं हेच खरे संस्कार आहेत.

पंधरा दिवसांच्या सलग कार्यक्रमामध्ये संस्थेशी निगडित सर्व माजी सदस्यांप्रती आपण कृतज्ञता व्यक्त केली. आपल्या आद्य गुरूंना विनम्र वंदन केले. त्यांनी घालून दिलेल्या वाटेच्याही पुढची वाट धरली पण आपली पठडी कायम ठेवून. ह्या कार्यक्रमातील एक फार मोठी गोष्ट अशी आहे, ज्या श्री. दिलीप गोसावींनी ३५ वर्षांपूर्वी श्री. प्रमोद मराठ्यांना हार्मोनियमचे गमभन शिकवले आणि आपल्या वादनाने गोडी लावली त्यांना आदरपूर्वक आमंत्रित केले आणि ६ मे २०१२ रोजी त्यांचा जो सत्कार केला गेला तो कृतज्ञता सोहळ्याचा कळसाध्याय ठरला. आज जागतिक कीर्तीचे हार्मोनियम वादक म्हणून प्रसिद्धी मिळाल्यानंतर प्रथम गुरूंचे स्मरण ठेवून त्यांना १० ग्रॅमचे वळे अर्पण करणे हा अतिशय हृद्य सत्कार समजला जाईल.

ज्या दिवशी हा सत्कार झाला त्या दिवशी काही कारणाने मी कार्यक्रमाला हजर राहू शकले नव्हते. पण रात्री प्रमोद माझ्या घरी आला होता. मला स्मरणिका देताना त्याने मला इतके शांतपणे ह्या सत्काराविषयी सांगितले की त्यात कोणत्याही अहंभाव नव्हता. मला मात्र आनंदाश्रू अनावर झाले. ताबडतोब ह्या विषयावर लेख लिहिण्याचे ठरवले. दुसऱ्या दिवशी त्याला फोन करून मला तो फोटो पाहिजे हे प्रमोदची मोठी बहीण म्हणून हक्काने सांगितले.

कृतज्ञता आली की अहंकार नाहीसा होतो आणि अहंकाररहीत मन म्हणजे निर्मळ मन. निर्मळ मनाने गुरुंच्या प्रती कृतज्ञता समारोह आपल्या हातून पार पाडणे ह्यासारखे भाग्य दुसरे काय असणार?

**- सौ. वर्षा गोडबोले (पृ१२९) संचालिका**

सरगम संगीत विद्यालय, कोथरूड, पुणे ३८, फोन नं. ०२०-२५४३९७६४/९८२२०५४६४०

Marathe Pratishthan

## प्रत्येकाचं स्वप्न, प्रत्येकाचं घर



घरातल्या प्रत्येकाच्या स्वप्नांचा आम्ही विचार करतो.
म्हणूनच आम्ही प्रत्येक गृहरचनेत मोकळेपणा, उत्कृष्ट जीवनशैली आणि आधुनिक सुखसुविधांचा समावेश करतो. हे घर तुम्हांला सहजतेने घेता यावं यासाठी वाजवी दरही देतो.
हेच तर आहे निर्माण. तुमच्या स्वप्नांचे आणि सुंदर गृहरचनांचे !

विश्वसनीय परंपरा आणि पारदर्शक व्यवहार

निर्माण ग्रुप
ऑफ कंपनीज्
बिल्डर ॲंड डेव्हलपर्स

### आमचे आधुनिक जीवनशैलीचे प्रकल्प

मुंबईतील प्रकल्प स्थाने : महालक्ष्मी | जोगेश्वरी | मालाड (आझाद) | कांदिवली (पूर्व) आणि (पश्चिम) | गोवंडी | जोगेश्वरी

मुंबई बाहेरील प्रकल्प स्थाने : नेरळ | गोरेगाव आणि माणगाव | गणपतीपुळे

imepl09/09

Project marketed by
DREAMZ
( A NIRMAN Group Enterprise )

हेड ऑफिस : 14, न्यायसागर, फिनॉय कॉलेज जवळ, जुना नागरदास रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - 400069
फोन : 91 9987686847 / 48 / 49 | SMS <DREAMZ> 567678


**मराठे परिवाराला नवीन वर्ष सुखसमृद्धीचे व समाधानाचे, उत्तम आरोग्याचे आणि भरभराटीचे जावो, ह्या शुभेच्छा!**

BOOK POST

**If undelivered, please return to**

**संपादिका : 'हितगुज'**
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१


त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल : (१) sitaram_khambete@yahoo.com (२) maratheparivar@yahoo.co.in ◉ वेबसाईट : www.marathepratishthan.org


Marathe Pratishthan